रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ३२
www.ramprahar.com
◆ मंगळवार, १८ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

# ना. भरत गोगावले रायगडचे पालकमंत्री

## ■ नाशिकची धुरा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड आणि नाशिक जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाचा विषय अखेर मार्गी लागला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.१७) दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्री नियुक्तीला मंजुरी दिली. त्यानुसार नाशिकच्या पालकमंत्रिपदी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि जलसंपदामंत्री गिरीश महाजन, तर रायगडच्या पालकमंत्रिपदी शिवसेना नेते तथा फलोत्पादन आणि रोहयो मंत्री भरत गोगावले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



नाशिकसाठी भाजपव्यतिरिक्त शिवसेनेकडून मंत्री दादा भुसे आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार गट) मंत्री छगन भुजबळ या पदासाठी उत्सुक होते, पण नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि विविध विकासकामांचा आढावा घेण्याची जबाबदारी आधीच 'कुंभपर्व मंत्री' म्हणून गिरीश महाजन यांच्याकडे सोपवण्यात आली होती. म्हणून त्यांच्याकडेच नाशिकचे पालकमंत्रिपद सोपवण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

दुसरीकडे स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने १५ ऑगस्ट रोजी रायगड जिल्ह्यात ध्वजारोहणाची जबाबदारी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे सोपवण्यात आली होती. त्याचवेळी ना. गोगावले यांची रायगडच्या पालकमंत्रिपदी नियुक्ती होणार असल्याचे संकेत मिळाले होते. अखेर शासनाच्या आदेशाने या चर्चेला अधिकृत दुजोरा मिळाला आहे.

यापूर्वीच्या सरकारमध्ये रायगडच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी शिवसेनेचे उदय सामंत यांच्याकडे होती. त्यानंतर हे पद रिक्त होते. काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधान परिषद निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे यांना आमदार करण्यासाठी शिवसेनेची भूमिका महत्त्वाची ठरली. त्यावेळी झालेल्या राजकीय समझोत्यानुसार रायगडचे पालकमंत्रीपद शिवसेनेच्या पारड्यात टाकण्याचे निश्चित झाले होते. याबाबत झालेल्या निर्णयामुळे गेल्या अनेक वर्षांपासून रायगडचे पालकमंत्री होण्याची ना. गोगावले यांची इच्छा अखेर पूर्ण झाली आहे.

# भाजपची नवीन राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर

## विनोद तावडे, पीयूष गोयल, भारती पवार यांचा समावेश



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी सोमवारी (दि.१७) पक्षाच्या नव्या राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा केली. यात महाराष्ट्रातील नेत्यांना महत्त्वाची पदे देऊन राज्याचे स्थान अधिक बळकट करण्यात आले आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते खासदार विनोद तावडे यांची राष्ट्रीय सरचिटणीसपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली असून खासदार केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्याकडे कोषाध्यक्षपदाची, तर माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्याकडे उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

नव्या केंद्रीय संघटनेत उपाध्यक्षपदी एकूण १३ नेत्यांचा समावेश करण्यात आला असून त्यात राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधराराजे सिंधिया, उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री तीरथसिंह रावत, राम माधव, बैजयंत जय पांडा आणि डी. पुरंदेश्वरी यांच्यासोबत महाराष्ट्रातील डॉ. भारती पवार यांना स्थान देण्यात आले आहे. सरचिटणीस म्हणून विनोद तावडे यांच्यासह सुनील बन्सल, बिप्लब कुमार देब, स्मृती इराणी, डॉ. सतीश पूनिया आणि हरीश द्विवेदी यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे. बी.एल. संतोष यांच्याकडे सरचिटणीस (संघटन) पद कायम ठेवण्यात आले आहे, तर सहसरचिटणीस (संघटन) म्हणून शिवप्रकाश आणि सौदान सिंह यांची नियुक्ती करण्यात आली आहे. **(पान २ वर..)**

# एन.डी. स्टुडिओत ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाने परिचालनासाठी घेतलेल्या कर्जत येथील एन.डी. स्टुडिओच्या अध्यक्षपदाचा पदभार सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी सोमवारी (दि.१७) स्वीकारला. यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची बैठक झाली.

एन.डी. स्टुडिओत येणाऱ्या पर्यटकांसाठी थीम पार्क प्रवेश शुल्क, चित्रिकरणासाठी उपलब्ध स्थळे, कलाकार व निर्मात्यांसाठी निवासव्यवस्थेवर ३१ मार्च २०२७पर्यंत ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय यावेळी बैठकीत घेण्यात आला.






# मी महाराष्ट्रातच राहणार -मुख्यमंत्री फडणवीस

## राज्यातील विविध विषयांसंदर्भात पंतप्रधान मोदींची घेतली भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

"अनेक लोकांना मी दिल्लीत जावेसे वाटत असले, तरी मी महाराष्ट्रातच आहे आणि महाराष्ट्राच्या जनतेची प्रामाणिकपणे सेवा करत राहणार आहे," असा पुनरूच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.१७) केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर नवी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते.



आपल्या दिल्ली दौऱ्याचे कारण स्पष्ट करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील एकूण प्रशासन, महत्त्वाचे प्रकल्प आणि केंद्र सरकारकडून अपेक्षित असलेली मदत या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन विस्तृत पत्र दिले. महामार्ग, रेल्वे, मेट्रो आणि नदी जोड प्रकल्पांसह विविध टप्प्यांवर असलेल्या विकासकामांना गती देण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

पुणे येथे टाटा समूहासोबत विकसित करण्यात आलेल्या आणि देशातील नव्या धोरणानुसार सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावरील पहिल्या पुणे मेट्रो ३चे काम जवळपास पूर्ण झाले आहे. सध्या या मेट्रोची चाचणी (टेस्टिंग) सुरू असून उद्घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण देण्यात आले आहे. पंतप्रधानांकडून लवकरात लवकर तारीख मिळवून उद्घाटनाचा कार्यक्रम पार पाडण्याचा मानस मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

### दिल्लीत जाण्याच्या चर्चांवर टोलेबाजी

दिल्लीत जाण्याबाबत विरोधकांनी केलेल्या टीका-टिप्पणीबाबत मुख्यमंत्री म्हणाले की, मी दिल्लीत असलो तरी चर्चा होतात आणि मुंबईत असलो तरी चर्चा होतात. ज्या कुणाला जे तारे तोडायचे आहेत, ज्याला जे फुगे उडवायचे आहेत, जी काही पतंगबाजी करायची आहे ती करूद्या. मी महाराष्ट्रात आहे. मी प्रामाणिकपणे महाराष्ट्राच्या जनतेची सेवा करतो आहे आणि ती करत राहणार आहे.

# अमेरिकन डॉलरचे आमिष दाखवून दोन लाखांची फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

कापडामध्ये अमेरिकन डॉलर असल्याचे भासवून ते देण्याचे आमिष दाखवत एका तरुणाची तब्बल दोन लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना तुर्भे गावात घडली. याप्रकरणी एपीएमसी पोलिसांनी दोन अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार कृष्णकुमार बासुदेव महातो (३६) हे व्यवसायाने कुक असून घाटकोपर पश्चिम येथे वास्तव्यास आहेत. बुधवारी दुपारी सव्वाबारा ते एक वाजण्याच्या सुमारास ते तुर्भे गावातील साई बारजवळ आले होते. यावेळी आलम (वय २८) आणि काळ्या रंगाचा फुल बाह्यांचा टी-शर्ट व काळी पॅन्ट परिधान केलेल्या एका अज्ञात इसमाने त्यांच्याशी संपर्क साधला. आरोपींनी एका कापडामध्ये अमेरिकन डॉलर असल्याचे सांगून ते देण्याचे आमिष दाखवले. त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून महातो यांनी आरोपींना २ लाख रुपये रोख दिले. यामध्ये ५०० रुपयांच्या ४०० नोटांचा समावेश होता. पैसे मिळताच आरोपी तेथून पसार झाले. आरोपी निघून गेल्यानंतर महातो यांनी कापड उघडून पाहिले असता त्यामध्ये अमेरिकन डॉलर नसल्याचे स्पष्ट झाले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी एपीएमसी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. याप्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक सागर आव्हाड तपास करीत आहेत.

# खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते नमो उद्यानाचे उद्घाटन

**तळा : प्रतिनिधी**

शहराचे सुशोभीकरण करणे व नागरिकांना विरंगुळ्यासाठी पर्यावरण पूरक सुविधा उपलब्ध करुन देणे असे उद्देश असणारे तळा शहरातील नमो उद्यानाचे उद्घाटन १७ ऑगस्ट रोजी रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांचे हस्ते करण्यात आले.



यावेळी नगराध्यक्ष माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे,पर्यटन सभापती अविनाश पिसाळ, राष्ट्रवादी शहरअध्यक्ष चंद्रकांत भोरावकर, भाजपा अध्यक्ष निलेश रातवडकर, शहरप्रमुख राकेश वडके, शहर अध्यक्षा मेघा सुतार,नगरसेवक मंगेश शिगवण,सारिका गवळी,रितेश मुंढे,नेहा पांढरकामे,मंगेश पोळेकर,नरेशसुर्वे,दिव्या रातवडकर, मुख्याधिकारी मनिषा वजाळे,आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खासदार सुनील तटकरे म्हणाले की तळा नगरपंचायतीने चांगल्या पध्दतीचे काम करत हे तळा शहरातील पहिले नमो उद्यान गार्डन झालय याचा खासदार म्हणून मला अभिमान आहे.

# भाजपच्या पाठपुराव्याला यश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील भाविक व नागरिकांची अनेक दिवसांची मागणी अखेर पूर्ण झाली असून माणगावश्री क्षेत्र अमृतेश्वर म्हसळा या मार्गावर बससेवा सुरू करण्यात आली आहे. भाजपच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे.



भाजप म्हसळा तालुकाध्यक्ष निलेश मांदाडकर व तालुका सरचिटणीस रमेश पोटले यांनी ग्रामस्थ व ग्रामपंचायतीच्या वतीने ही बससेवा सुरू करण्याची मागणी भाजप दक्षिण रायगड युवामोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्याकडे केली होती. त्यानंतर या मागणीसंदर्भातील पत्र माणगाव आगाराच्या डेपो मॅनेजर छाया कोळी यांच्याकडे देण्यात आले.

या मागणीला डेपो मॅनेजर छाया कोळी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तत्काळ संबंधित मार्गाची पाहणी केली आणि बस सुरू करण्यास मंजुरी दिली. त्यांच्या तत्पर निर्णयामुळे माणगाव श्री क्षेत्र अमृतेश्वर म्हसळा मार्गावरील ग्रामस्थ, भाविक, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### माणगाव ते श्रीक्षेत्र अमृतेश्वर म्हसळा बससेवा सुरू

श्रावण महिन्यात श्री क्षेत्र अमृतेश्वर मंदिर, देवघर येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. या बससेवेमुळे भाविकांना मंदिरात जाण्यासाठी तसेच परिसरातील नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे.

बससेवा सुरू करण्यासाठी पुढाकार घेणारे भाजपा म्हसळा तालुकाध्यक्ष निलेश मांदाडकर, तालुका सरचिटणीस रमेश पोटले तसेच पाठपुरावा करणारे भाजपा दक्षिण रायगड युवामोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांचे ग्रामस्थांकडून आभार मानण्यात आले.

तसेच मागणीला तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत मार्गाची पाहणी करून बससेवेला मंजुरी देणाऱ्या डेपो मॅनेजर श्रीमती छाया कोळी यांचेही ग्रामस्थ व भाविकांकडून सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत असून त्यांचे विशेष आभार मानण्यात आले आहेत.

# पद्मश्री गोडबोले दाम्पत्याचा वनवासी कल्याण आश्रमतर्फे सन्मान

**माणगाव : प्रतिनिधी**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्रातर्फे पद्मश्री डॉ. राम गोडबोले व पद्मश्री सुनीता ताई गोडबोले या दाम्पत्याचा माणगाव येथील वनवासी कल्याण आश्रमशाळेत सन्मान करण्यात आला. आदिवासी समाजाच्या आरोग्यसेवेसाठी गोडबोले दाम्पत्याने केलेल्या प्रदीर्घ व उल्लेखनीय कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना २०२६चा पद्मश्री पुरस्कार प्रदान केला. या गौरवाचे औचित्य साधून सत्कार व सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

वनवासी कल्याण आश्रम कोकण प्रांताचे अध्यक्ष विष्णूजी सुरूम व उपाध्यक्ष मधुकरजी गावित यांच्या हस्ते गोडबोले दाम्पत्याचा सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रायगड जिल्हा संघचालक शिवराज भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास ज्येष्ठ कार्यकर्ते दत्तोपंत साळुंखे, वनवासी कल्याण आश्रम रायगड जिल्हा सचिव मनोज कामत, उपाध्यक्ष रवींद्र बोरसे, सहसचिव नितीन चांदोरकर, सुभाष अधिकारी, प्रशांतजी ढेपे, राजेश माटे, श्री व सौ. कोपरकर (पुणे), अमेय भावे, भिवा पवार , मुख्याध्यापक उत्तम पाटील, अरुण पाटील, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि माणगाव शहरातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.




वनवासी कल्याण आश्रमशाळेची माजी विद्यार्थिनी सपना राजेश वाघमारे यांना शिष्यवृत्ती मिळाली असून लंडन येथे एलएलएमचे शिक्षण घेण्याची संधी मिळाल्या बद्दल तिच्या उल्लेखनीय यशाबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तिचा विशेष सत्कार करण्यात आला. आश्रमशाळेचे मुख्याध्यापक उत्तम पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली.

यानंतर पद्मश्री डॉ. राम गोडबोले यांनी छत्तीसगडमधील बस्तर येथे गेल्या ३६ वर्षांत केलेल्या कार्याचा आणि तेथील आदिवासी समाजाच्या जीवनातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक बदलांचा अनुभव उपस्थितांसमोर मांडला. पद्मश्री सुनीता ताई गोडबोले यांनी आपल्या जडणघडणीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि वनवासी कल्याण आश्रम यांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशन पडवळ यांनी केले.

# पनवेल मनपाच्या महिला व बालकल्याण विभागाचा अभिनव उपक्रम

## बांबू कौशल्य विकास प्रशिक्षण उपक्रमाचे उत्साहात उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत मुली व महिलांना बांबूपासून विविध पारंपरिक तसेच आधुनिक वस्तू तयार करण्याचे कौशल्य मिळावे आणि त्यातून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने प्रभागनिहाय 'बांबू कौशल्य विकास प्रशिक्षण' उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या प्रशिक्षणाचा उद्घाटन समारंभ सोमवारी (दि. १७) कळंबोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे महिला व बालकल्याण सभापती ममता प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात करण्यात आले.

यावेळी नगरसेविका सरस्वती काथारा, उपायुक्त मंगला माळवे, सहाय्यक आयुक्त रुपाली माने, विभागप्रमुख कविता मोकल, डे-एनयूएलएम व्यवस्थापक विनया म्हात्रे, डीएसएस वर्ल्डच्या संचालिका आसावरी येवतेकर, तसेच माया सावंत व अमोल पलस्कर उपस्थित होते.

महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना अधिकाधिक महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. बांबूपासून विविध वस्तू तयार करण्याचे कौशल्य आत्मसात केल्यास महिलांना स्वयंरोजगार, घरगुती उद्योग व लघुउद्योग सुरू करून उत्पन्नाचे नवे साधन निर्माण करता येईल, असे त्यांनी सांगितले. प्रशिक्षणास नियमित उपस्थित राहून ते यशस्वीपणे पूर्ण करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

डीएसएस वर्ल्डच्या प्रतिनिधी माया सावंत यांनी प्रशिक्षणाची सविस्तर माहिती देताना प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरणपूरक पर्याय म्हणून बांबूचा वापर वाढविण्याची गरज व्यक्त केली. हे प्रशिक्षण एक महिन्याचे असून त्यामध्ये विविध बांबू उत्पादनांची निर्मिती करण्याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डीएसएस वर्ल्डच्या संचालिका आसावरी येवतेकर यांनी बांबूपासून तयार करण्यात येणाऱ्या विविध उत्पादनांचे प्रात्यक्षिक व प्रदर्शन केले.

यामध्ये बांबूचे कॉफी मग, फळांची टोपली, चहाची ट्रे, दिवे, सुशोभीत फुले, स्वयंपाकघर संच, टेबल मॅट, पॉकेट यांसह विविध आकर्षक व उपयुक्त वस्तूंचा समावेश होता.

या प्रशिक्षणामुळे महिलांना बांबूपासून पर्यावरणपूरक व बाजारपेठेत मागणी असलेल्या वस्तू तयार करण्याचे कौशल्य मिळणार असून, त्यातून स्वयंरोजगार, घरगुती उद्योग आणि लघुउद्योग उभारण्याच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालण्यासह बांबू उत्पादनांच्या माध्यमातून महिलांना स्वतःचा व्यवसाय उभारण्यासही मदत होणार आहे.

# तिरंगा घेऊन निघाले मॉर्निंग वॉकर्स

## कोपरखैरणेत स्वातंत्र्य दिनाचा अनोखा जल्लोष!

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून नवी मुंबईत सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. याच उत्साहाचा प्रत्यय कोपरखैरणे येथील एका उद्यानात सकाळी पाहायला मिळाला. काही जागरूक नागरिकांनी तिरंगा ध्वज हातात घेऊन मॉर्निंग वॉक करून देशप्रेमाचा संदेश दिला.

सकाळी कोपरखैरणे येथील उद्यानात नेहमीप्रमाणे काही नागरिक मॉर्निंग वॉकसाठी आले होते, मात्र आज त्यांच्या हातात तिरंगा ध्वज होता. त्यांनी उद्यानात फेऱ्या मारताना



देशप्रेमाचा जयघोष केला. या अनोख्या उपक्रमामुळे उद्यानात आलेल्या इतर नागरिकांमध्येही देशप्रेमाची भावना जागृत झाली.या उपक्रमात सहभागी झालेल्या एका युवकाने सांगितले की, "आपल्या देशाला मिळालेले स्वातंत्र्य खूप मोलाचे आहे. ते जपण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. स्वातंत्र्य दिनाचा हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी आम्ही हा उपक्रमा घेतला. देशातील प्रत्येक नागरिकाने देशप्रेमाची भावना जागृत ठेवावी, हाच आमचा संदेश आहे."कोपरखैरणे येथील या उपक्रमाने नवी मुंबईत स्वातंत्र्यदिनाचा उत्साह आणखी वाढवला आहे.

# उरण एसटी बसस्थानक परिसरात सिद्धांत सेवा संस्थेतर्फे वृक्षारोपण

**उरण : वार्ताहर**

भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर तसेच राज्य परिवहन महामंडळ ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त जाहीर करण्यात आलेल्या वृक्षारोपण बाबतच्या संकल्पनेला साथ देण्याकरिता सिद्धांत सेवा संस्था, पनवेल-रायगड यांच्या वतीने शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी राज्य परिवहन महामंडळ, उरण आगार बस स्थानक परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने सिद्धांत सेवा संस्था ही गेली १५ वर्ष अविरतपणे विविध उपक्रम राबवत आली आहे. या कार्यक्रमांतर्गत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणानंतर लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमास उरण आगाराचे आगार व्यवस्थापक मा. तुषार गंद्रे साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर त्याच बरोबर उरण आगारातील विविध कर्मचारी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिद्धांत सेवा संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय कोळी, उपाध्यक्ष श्री. शशिकांत गोरड, सचिव श्री. मिलिंद जाधव व खजिनदार श्री. अरुण दुष्मीकर, श्रीमती स्वामींनी पाठक, श्रीमती पितळे मॅडम, वसंत वास्के, श्री. महावीर उरुणकर, तसेच राज्य परिवहन महामंडळ उरण आगारातील श्री. राजेंद्र गायकवाड, श्री. संदेश म्हात्रे, श्रीमती कादंबरी म्हात्रे, श्रीमती सुचिता गावंड, श्रीमती ममता बोडके , श्रीमती शिवानी बांदल हे अधिकारी, कर्मचारी, चालक-वाहक व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी "वृक्ष लावा, वृक्ष जगवा आणि पर्यावरणाचे रक्षण करा" हा संदेश देत प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. सामाजिक बांधिलकी जपत सिद्धांत सेवा संस्थेने राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी भविष्यातही विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याचा निर्धार संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला.



पान १ वरुन

# भाजपची नवीन राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर

केंद्रीय स्तरावरील या फेररचनेत पक्षाच्या आर्थिक व्यवहारांची धुरा पीयूष गोयल यांच्यावर देण्यात आली आहे. त्यांच्यासोबत राजस्थानचे राजेश मंगल हे राष्ट्रीय संयुक्त कोषाध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत. याशिवाय सोशल मीडिया विभागात महाराष्ट्रातील प्रीती गांधी यांची को-कन्व्हेनर (सह-संयोजक) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

युवकांना अधिकाधिक संधी

भाजपने आपल्या विविध मोर्चांच्या अध्यक्षांचीही नावे जाहीर केली आहेत. यात भाजप युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी गुजरातचे डॉ. हेमंग जोशी, महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी छत्तीसगडच्या रूप कुमारी चौधरी आणि ओबीसी मोर्चाच्या अध्यक्षपदी उत्तर प्रदेशचे अमरपाल मौर्य यांची निवड झाली आहे. किसान मोर्चाची जबाबदारी मध्य प्रदेशचे बन्सीलाल गुर्जर, एससी मोर्चाची बिहारचे शिवेश कुमार राम, एसटी मोर्चाची डॉ. मन्नालाल रावत आणि अल्पसंख्याक मोर्चाची जबाबदारी उत्तर प्रदेशचे कुँवर बासित अली यांच्याकडे देण्यात आली आहे. केंद्रीय कार्यालय प्रभारी म्हणून तरुण चुघ आणि मीडिया कन्व्हेनर म्हणून अनिल बलुनी काम पाहणार आहेत.

स्वातंत्र्य दिन आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचा ८०वा स्वातंत्र्य दिन आणि पनवेल नगरीचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत दूंदरे अंतर्गत चिंचवली, रिटघर, दूंदरेपाडा, दूंदरे आणि शिवणसई येथील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम माजी सरपंच रमेश पाटील आणि गुरुनाथ उसाटकर यांच्या माध्यमातून राबविण्यात आला.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांना आवश्यक शालेय साहित्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, सदस्य वर्षा केवारे, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजप अनुसूचित सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, तसेच दूंदरे ग्रुप ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच अनुसया वाघमारे, सदस्य शांताराम चौधरी, प्रलय भोपी, ललिता चौधरी, राणी सिनारे, विश्वास पाटील, माजी उपसरपंच नारायण चौधरी, चिंचवली शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विकास भगत, माजी अध्यक्ष भालचंद्र भोपी, तुकाराम म्हस्कर, विठ्ठल शेळके, सुधीर पालांडे यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला मंडळाचे पदाधिकारी, विद्यार्थी आणि शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे शालेय साहित्य वितरित करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या उत्साहपूर्ण वातावरणात आणि आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे, या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल उपस्थितांनी आयोजक रमेश पाटील आणि गुरुनाथ उसाटकर यांचे विशेष कौतुक केले.

विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणारे असे सामाजिक उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्यात यावेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी एक्सचेंज कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात फॅकल्टी एक्सचेंज कार्यक्रमांतर्गत एस वाय बॅक फायनान्शिअल अकाउंटिंग या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी करण्यात आले.



या व्याख्यानासाठी वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट सानपाडा येथील प्राध्यापिका प्रा. हिना सातकुण यांनी मार्गदर्शन केले.या व्याख्यानामध्ये द्वितीय वर्षाच्या एकूण ५२ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी त्यांनी फायनान्शिअल अकाउंटिंग या विषयातील महत्त्वाच्या संकल्पना, लेखाशास्त्रीय पद्धती, व्यवहारांचे अचूक लेखांकन तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या विविध बाबींचे सविस्तर विवेचन केले.

व्याख्यानादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. प्राध्यापिकांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून विषय अधिक सोप्या व व्यावहारिक पद्धतीने समजावून सांगितला. त्यामुळे विद्यार्थ्यांना लेखाशास्त्रातील संकल्पना अधिक प्रभावीपणे समजून घेण्यास मदत झाली.

फॅकल्टी एक्सचेंज कार्यक्रमामुळे विविध महाविद्यालयांतील प्राध्यापकांना आपले ज्ञान, अध्यापन अनुभव आणि विषयातील अद्ययावत माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांच्या शैक्षणिक तसेच व्यावसायिक विकासाला चालना मिळते. महाविद्यालयातील प्रा. आनंद शेलार यांनी वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट येथे जाऊन तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना फायनान्शिअल अकाउंटिंग या विषयाचे मार्गदर्शन केले.

# कळंबोलीत जीर्ण झाड कोसळले

## सुदैवाने जीवितहानी टळली

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील KL-२, सेक्टर-४, पाण्याच्या टाकी समोर, बिल्डिंग क्रमांक ४ वरती जीर्ण झालेले झाड अचानक कोसळल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठी मालमत्तेची हानी झाली नाही.



झाड कोसळल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच महापालिकेचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून, कोसळलेले झाड हटविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

दरम्यान, परिसरातील जीर्ण व धोकादायक झाडांची पाहणी करून त्याबाबत तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पावसाळ्यात जीर्ण झाडे कोसळण्याचा धोका वाढत असल्याने महापालिकेने अशा धोकादायक झाडांचे सर्वेक्षण करून वेळीच छाटणी किंवा आवश्यक ती उपाययोजना करावी.

# नागपंचमीनिमित्त गव्हाण विद्यालयात नागशिल्प प्रदर्शन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी नागपंचमीचे औचित्य साधून नागशिल्प प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत विविध आकर्षक नागशिल्पे तयार करून प्रदर्शनात मांडली.



नाग हा शेतकऱ्यांचा तसेच पर्यावरणाचा महत्त्वाचा मित्र असून, सापांविषयी समाजात असलेल्या गैरसमज व अंधश्रद्धा दूर करून विद्यार्थ्यांमध्ये सर्पविज्ञान, सर्पसंवर्धन आणि पर्यावरणीय समतोलाबाबत जागृती निर्माण करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी कलात्मक पद्धतीने साकारलेल्या नागशिल्पांतून सापांविषयी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश देण्यात आला.यावेळी विद्यालयाच्याप्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलसदस्य व ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, तसेच सुरेशपारखे, विद्या पाटील, हर्षला पाटील, शितल कुमार म्हात्रे, सुजाता शेलार, सोनाली घरत, ज्योत्स्ना कोळी,आफरीन शेख आदींच्या हस्ते सर्पमूर्तीचे पूजन करण्यात आले.

इयत्ता आठवी 'अ'च्या वर्गाने वर्गशिक्षिका श्रीमती विद्या पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली याउपक्रमाचे नियोजन व आयोजन केले. प्रदर्शनातील नागशिल्पांचे गटनिहाय परीक्षण करून उत्कृष्टकलाकृतींची निवड करण्यात आली. या नागशिल्पांचे परीक्षण करणारे परीक्षक म्हणून कलाशिक्षक गणेश भोईर सर व सौ दर्शना माळी मॅडम यांनी परीक्षकाची भूमिका पार पाडली.इयत्ता पाचवी ते सातवीया लहान गटात प्रथम क्रमांक पलक पंकज ठाकूर, द्वितीय क्रमांक कशीश सचिन कोळी व जन्या अजयघरत, तर उत्तेजनार्थ क्रमांक निकिता विठ्ठल कोळेकर व तेजस विश्वकर्मा यांनी मिळविला.इयत्ता आठवीते दहावी या गटात प्रथम क्रमांक आलिया आजाम खान, द्वितीय क्रमांक स्नेहल सनी बाबर, तृतीयक्रमांक सान्वी गणेश नाईक, तर उत्तेजनार्थ क्रमांक हंसिका सविता पाटील हिने मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांना आगामी कार्यक्रमात पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे.

याप्रसंगी इयत्ता आठवी 'अ'च्या विद्यार्थ्यांसाठी भाषणाचा कार्यक्रमही घेण्यात आला. आरती प्रकाश कुरवाडे, समृद्धी बिरू चुंबळे, वैशाली सुगंध पवार याविद्यार्थ्यांनी सर्पविज्ञान, सापांचे पर्यावरणातील महत्त्व तसेच सापांविषयी समाजात असलेल्या अंधश्रद्धांवर आपले विचार मांडले. प्रा. सौ करुणा तांडेल यांनी विद्यार्थ्यांना सर्पविज्ञान व सर्पसंवर्धनाबाबत मार्गदर्शन करून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आवाहन केले. नागपंचमीच्या पारंपरिक सणाला वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरण संवर्धन आणि अंधश्रद्धा निर्मूलनाची जोड देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरला.

# फुंडे विद्यालयात नागपंचमी उत्साहात साजरी; सापांचे संवर्धन करण्याचे आवाहन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत नागपंचमी सण साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या उपमुख्यापिका एस. डी.थोरात, पर्यवेक्षिका एस.एस.पाटील, लेखनिक नवनीत ठाकूर व उपस्थित सेवक वृद्धांच्या हस्ते नागदेवतेची विधिवत पूजा करून सुख समृद्धी व आरोग्यासाठी प्रार्थना केली. नागपंचमी हा सण केवळ धार्मिक श्रध्देपुरता मर्यादित नसून निसर्गातील सर्प व इतर जीवसृष्टीचे संरक्षण करण्याचासंदेश देणारा सण म्हणूनही महत्त्वाचा आहे प्रसंगी विद्यालयातील श्रेया शिंदे, क्रिशा चव्हाण,श्रवण गोरे यांनी नागपंचमीची माहिती सांगितली.या वेळी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका



एस.एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. नागपंचमीची माहिती सांगत साप हा शेतकऱ्याचा मित्र असून पर्यावरणातील समतोल राखण्यात त्याची महत्त्वाची भुमिका आहे. सापांना इजा न करता त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

नागपंचमी या दिवसाचे औचित्य साधून नागशिल्प कला प्रदर्शनाचे आयोजन केले. सदर प्रदर्शनास उत्तम प्रतिसाद लाभला कला प्रदर्शनात प्रथम क्रमांक रोशनी घाडगे, द्वितीय क्रमांक अंजली गौंड तर तृतिय क्रमांक शुभम सिंग यांनी मिळवीला.उपशिक्षिका डी.जी.पाटील यांच्या मार्गदर्शना खाली इयत्ता नववी ब च्या विदयार्थ्यांनी कार्यक्रमाची छान तयारी केली होती. सर्वांनी नागदेवतेचे मनोभावे दर्शन घेतले.







पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अमोघ ठाकूर यांचा वाढदिवस रविवारी उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. या स्नेहमयी सोहळ्यात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, अर्चना ठाकूर, माजी पं.स. माजी सदस्य रत्नप्रभा घरत, सागर ठाकूर, विशाल ठाकूर, दर्शन ठाकूर, स्वप्नील ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर आणि आदेश ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबीयांनी अमोघ ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या.

## महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र, चेन खेचली

**नवीन पनवेल** : घरी पायी चालत जात असलेल्या ६५ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र आणि सोन्याची चैन खेचून दोघेजण मोटरसायकलवरून पळून गेल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात १६ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मालन कांबळे या खांदा कॉलनी, येथे राहत असून त्या घरी जात होत्या. महात्मा हायस्कूल शेजारच्या रस्त्यावर आले असता मोटरसायकलवरील दोन अनोळखी आरोपींनी त्यांच्या गळ्यातील सोन्याच्या पट्ट्या आणि चेन तसेच मंगळसूत्र आणि सोन्याची चेन खेचून पळून गेले.

## आरएमसी प्लांटच्या मिक्सरमध्ये पडून मृत्यू

**नवीन पनवेल :** आरीवली येथील आरएमसी प्लांटच्या मिक्सरमध्ये पडून मनीष कुमार बहरण यादव (वय १८) याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कृष्णकला डेव्हलपर्स आर एम सी प्लांटचे संबंधित व्यक्तींविरोधात १६ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. १६ ऑगस्ट रोजी दुपारी पाचच्या सुमारास मनीष कुमार यादव याला कृष्णकला डेव्हलपर्स आर एम सी प्लांटच्या संबंधित व्यक्ती यांनी कोणतीही सुरक्षित उपाययोजना न पुरवता आर एम सी प्लांटच्या ठिकाणी काम करण्यास लावले. यावेळी तो काम करत असताना तोल जाऊन आर एम सी प्लांटच्या मिक्सरमध्ये पडला.




## संपादकीय

# विकासाचा 'सप्तधारा' मंत्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेला नवी दिशा देण्यासाठी अधोरेखित केलेल्या 'सप्तधारा' परस्परांना बळ देणाऱ्या आहेत. उत्पादनाला तंत्रज्ञानाची, शेतीला पायाभूत सुविधांची, अर्थव्यवस्थेला सुरक्षेची आणि आधुनिकतेला संस्कृतीची साथ मिळाली तरच 'विकसित भारता'चा संकल्प वेगाने पूर्णत्वाला जाणार आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरील आपल्या संबोधनात 'विकसित भारता'च्या संकल्पाला नवी दिशा देताना 'शक्तीची सप्तधारा' अर्थात विकासाच्या सात प्रमुख प्रवाहांचा महामंत्रच देशाला दिला. विकासाची गती वाढविण्यासाठी हा आराखडा म्हणजे आत्मनिर्भर, आधुनिक आणि सामर्थ्यवान भारताची रूपरेषाच म्हणावी लागेल. भारताने आता केवळ विकासाचे स्वप्न पाहायचे नाही तर २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र म्हणून जगासमोर उभे राहण्याचा संकल्प प्रत्यक्षात आणायचा आहे. उत्पादन, शेती व अन्नप्रक्रिया, तंत्रज्ञान व नवकल्पना, पायाभूत सुविधा, संरक्षण, हरित व नील अर्थव्यवस्था आणि भारताची सॉफ्ट पॉवर या सात क्षेत्रांवर केंद्रित प्रयत्नांतून विकसित भारताचा पाया मजबूत केला जाईल असा दृढविश्वास पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला आहे. भारताने जगातील केवळ एक मोठी बाजारपेठ न राहता भारताला जगाचे उत्पादनकेंद्र बनविणे हा यामागचा उद्देश आहे. सुट्या भागांपासून मोठ्या उत्पादनांपर्यंत संपूर्ण मूल्यसाखळी भारतात विकसित करण्याचे लक्ष्य ठेवण्याची गरज आहे. औषधनिर्मिती तसेच सेमीकंडक्टर आदी अत्याधुनिक उद्योगांमध्ये भारताची जागतिक भूमिका आपल्याला मजबूत करायची आहे. उत्पादन वाढले की गुंतवणूक, रोजगार आणि निर्यात या तिन्ही क्षेत्रांना चालना मिळते. भारताचा शेतकरीही विकसित भारताचा केवळ लाभार्थी नव्हे तर भागीदार असणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन, साठवणूक आणि अन्नप्रक्रिया यांच्या माध्यमातून शेतीला अधिक लाभदायक बनवणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर आणि संशोधन या क्षेत्रांत भारताने केवळ तंत्रज्ञानाचा ग्राहक न राहता निर्माता व्हावे हाही यामागचा विचार आहे. या क्षेत्रांत जागतिक नेतृत्व करण्यासाठी ते आवश्यक आहे. एक कोटी तरुणांना एआयचे प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्टही या नव्या भारताची दिशा स्पष्ट करते. रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ आणि डिजिटल पायाभूत सुविधा यांचे जाळे जितके सक्षम, तितकी अर्थव्यवस्थेची गती अधिक असणार आहे. पायाभूत सुविधांच्या माध्यमातून भारतातील अंतर वेळ आणि खर्चाच्या दृष्टीनेही कमी करणे हे उद्दिष्ट आहे. आत्मनिर्भर संरक्षण उत्पादन, आधुनिक लष्करी तंत्रज्ञान आणि सुरक्षित डिजिटल व्यवस्था ही आजच्या भारताची अनिवार्य गरज आहे. मजबूत अर्थव्यवस्थेला तितक्याच भरभक्कम सुरक्षाकवचाची जोड असणे आवश्यक आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नव्हे तर समन्वय साधायचा आहे. अक्षय ऊर्जा आणि नील अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून भारताची प्रगती शाश्वत करण्याचा प्रयत्न आहे. योग, आयुर्वेद, भारताचा सांस्कृतिक वारसा, कला, चित्रपट आणि डिजिटल कंटेंट ही जगाला देण्यासारखी भारताची अमूल्य संपत्ती आहे. आर्थिक आणि लष्करी सामर्थ्याबरोबर सांस्कृतिक प्रभावही जागतिक नेतृत्वासाठी महत्त्वाचा आहे. मोदी सरकारने मांडलेली ही 'शक्तीची सप्तधारा' त्यामुळेच केवळ सात घोषणांचा संच नाही. तो २०४७ च्या भारतासाठी विकास, आत्मनिर्भरता आणि जागतिक नेतृत्वाचा एकात्मिक आराखडा आहे. आता गरज आहे ती 'सबका प्रयास' या भावनेने देशातील प्रत्येक नागरिकाने या सातही प्रवाहांना जनशक्तीची जोड देण्याच्या कामात आपले योगदान देण्याची.**

# माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा!

महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत माती आणि पाणी या दोन नैसर्गिक संसाधनांचे अनन्यसाधारण महत्व आहे. शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा थेट संबंध या दोन्ही घटकांशी आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आणि पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता ती व्यापक लोकचळवळ बनणे ही काळाची गरज आहे. याच विचारातून राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे.




दिवंगत सुधाकरराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करताना राज्यासमोरील दुष्काळ आणि पाणीटंचाईचे आव्हान केवळ मोठ्या धरणांच्या माध्यमातून सोडविता येणार नाही, हे ओळखले. पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे, तो जमिनीत मुरविणे आणि स्थानिक पातळीवरील जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे, या भूमिकेतून त्यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र दिला. पाणलोट विकास, भूजल पुनर्भरण, पाझर तलाव, गाव तलाव, नाला बांध, माती बंधारे आणि अन्य छोट्या जलसंधारण संरचनांवर त्यांनी भर दिला. जलसंधारणाला स्वतंत्र प्रशासकीय दिशा देत त्यांनी या विषयाला लोकसहभागाची जोड दिली. १९९१ ते १९९३ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी घेतलेले अनेक निर्णय आजही दिशादर्शक ठरतात. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती आणि जलसंधारणाची कामे यांची सांगड घालून त्यांनी जलस्रोत निर्मितीला चालना दिली. जलसंधारण हे केवळ अभियांत्रिकीचे काम नसून गावागावातील नागरिकांच्या सहभागातून उभे राहणारे अभियान आहे, ही भूमिका त्यांच्या कार्यातून स्पष्ट झाली. आज जलयुक्त शिवार, भूजल पुनर्भरण, पाणलोट विकास यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते.

याच योगदानाची दखल घेत दिवंगत सुधाकरराव नाईक यांचा स्मृतिदिन १० मे हा २००३पासून जलसंधारण दिन म्हणून साजरा केला जात होता, मात्र स्मृतिदिनाऐवजी जन्मदिवस अधिक उत्साहपूर्ण आणि लोकसहभागातून साजरा व्हावा, या विचारातून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विभागातील अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित घटकांशी चर्चा करून २१ ऑगस्ट हा दिवस जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी यास मान्यता दिल्यानंतर शासनाने त्याबाबतचा निर्णय घेतला. त्यामुळे यापुढे दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्राच्या जलसंधारण चळवळीचा महत्त्वपूर्ण दिवस ठरणार आहे.

यंदाचा जलसंधारण दिन केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता त्याला व्यापक जनसहभागाची जोड देण्यात आली आहे. १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था आणि विविध प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहचविण्याचा प्रयत्न आहे.

या अभियानातील सर्वात आकर्षक उपक्रम म्हणजे 'महा वॉकेथॉन २०२६ वॉक फॉर वॉटर'. २१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी तीन किलोमीटरची महा वॉकेथॉन आयोजिण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान दहा हजार नागरिकांच्या सहभागाचे उद्दिष्ट असून राज्यभरातून तीन लाखांहून अधिक नागरिक प्रत्यक्ष सहभागी होण्याची अपेक्षा आहे. नागरिक, युवक–युवती, विद्यार्थी, महिला, लोकप्रतिनिधी, अधिकारी–कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, माय भारत, क्रीडा संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग क्षेत्र, कलाकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर या उपक्रमात सहभागी होतील.

ही केवळ चालण्याची स्पर्धा नसून जलसंधारणासाठी जनजागृतीची सामूहिक पावले आहेत. वॉकथॉनच्या प्रारंभी सहभागी नागरिकांकडून मृद व जलसंधारणाची सामूहिक शपथ घेतली जाणार आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, मातीची धूप रोखणे, पावसाचे पाणी अडविणे आणि जलस्रोतांचे संवर्धन करणे याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' हा यंदाच्या अभियानाचा मुख्य संदेश आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेशही या चळवळीला दिशा देणार आहे.

युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येणार आहे. 'रील फॉर सॉईल ॲण्ड वॉटर कन्झर्वेशन' या उपक्रमातून १५ ते ३० वयोगटातील युवक–युवतींना मृद व जलसंधारणाचा संदेश सर्जनशील पद्धतीने मांडण्याची संधी मिळणार आहे. ३० ते ६० सेकंदांच्या इन्स्टाग्राम रिल्सच्या माध्यमातून मातीची धूप, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळी, बंधारे, वृक्षारोपण, भूजल पुनर्भरण आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर संदेश देता येणार आहे. अभिनय, संगीत, विनोद, लघुपट, ॲनिमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन दृश्ये किंवा अन्य नाविन्यपूर्ण माध्यमांचा वापर करून युवकांना आपली कल्पकता सादर करता येणार आहे. #SaveSoilSaveWater हा अधिकृत हॅशटॅग वापरून राज्यभरातून मोठ्या प्रमाणात रिल्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे.

जलसंधारणाचा संस्कार पुढील पिढीवर व्हावा यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. निबंध, चित्रकला, पोस्टर, वादविवाद स्पर्धा, जलसंधारणाची शपथ, 'एक शाळाएक शोषखड्डा', जलमित्र किंवा जलदूत घोषित करणे अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना जलसंधारणाशी जोडले जाणार आहे. २१ ऑगस्ट रोजी दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या जलसंधारणविषयक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

अभियानाच्या कालावधीत ग्रामीण आणि शहरी भागात प्रत्यक्ष जलसंधारणाच्या कामांनाही गती दिली जाणार आहे. विविध योजनांतर्गत कामांचे भूमिपूजन, लोकार्पण आणि जलपूजन, शेततळी व जलस्रोतांची पाहणी, अमृत सरोवरांच्या परिसरात वृक्षारोपण, नाला, तलाव, विहीर आणि पाझर तलावांची लोकसहभागातून स्वच्छता अशा उपक्रमांवर भर दिला जाणार आहे. जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना–पाणलोट विकास घटक यांसारख्या उपक्रमांची माहितीही जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. जलसंधारणाच्या कामात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांचा गौरव, लोकसहभागातून श्रमदान, जलस्रोतांचे संवर्धन आणि जनजागृती या माध्यमातून शासन आणि समाज यांच्यातील सहभाग अधिक दृढ करण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समन्वय साधून कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

आज हवामान बदल, अनियमित पाऊस, वाढते तापमान, भूजल पातळीतील घट आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे जलसुरक्षेचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. अशा परिस्थितीत सुधाकरराव नाईक यांनी दशकांपूर्वी दिलेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. जलसंधारणाची कामे किती झाली यापेक्षा ती किती परिणामकारक ठरली, पाणी किती काळ टिकले आणि पुढील पिढीसाठी आपण किती जलसाठा निर्माण केला, हा खरा प्रश्न आहे. मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड यांनी या अभियानाच्या माध्यमातून जलसंधारणाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, माती आणि पाणी ही निसर्गाची अमूल्य संपत्ती असून त्यांचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

२१ ऑगस्टचा 'जलसंधारण दिन' त्यामुळे केवळ एका महान नेत्याच्या स्मरणाचा दिवस न राहता महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी सामूहिक संकल्पाचा दिवस ठरला पाहिजे. सुधाकरराव नाईक यांना खरी आदरांजली त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात नाही, तर त्यांच्या विचारांना कृतीची जोड देण्यात आहे. प्रत्येक गावात जलस्रोत जपला, प्रत्येक शेतात पाण्याचा थेंब अडविला, प्रत्येक शाळेत जलसंधारणाचा संस्कार रुजविला आणि प्रत्येक नागरिकाने पाण्याची जबाबदारी स्वीकारली, तरच 'जलसंधारण दिना'चा खरा उद्देश साध्य होईल.

माती वाचली तर शेती वाचेल, पाणी जपले तर जीवन सुरक्षित राहील आणि लोकसहभाग वाढला तर महाराष्ट्र जलसंपन्न बनेल. चला, सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणाच्या विचारांना कृतीची जोड देऊया'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा!'

**–गजानन पाटील,** विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई



## बदलते तंत्रज्ञान

### बीएसएनएल आणखी दोन लाख ४जी टॉवर उभारणार

सरकारी दूरसंचार कंपनी BSNL आपल्या ४G नेटवर्कचा विस्तार आणखी वेगाने करण्याच्या तयारीत आहे.




देशभरात ४G सेवा मजबूत करण्यासाठी कंपनीकडून मोठ्या प्रमाणावर नवीन मोबाइल टॉवर उभारले जात आहेत. उपलब्ध सरकारी माहितीनुसार, जानेवारी २०२६पर्यंत BSNLने सुमारे ९७,६७२ स्वदेशी ४G साइट्स उभारल्या होत्या, त्यापैकी ९५,५११ साइट्स कार्यरत झाल्या होत्या. या उपकरणांमध्ये भविष्यात ५Gकडे अपग्रेड करण्याची क्षमता आहे.

दरम्यान, BSNLच्या नेटवर्क विस्ताराबाबत एक महत्वाची माहिती समोर आली आहे. कंपनी येत्या काळात आणखी दोन लाख नवीन ४G मोबाइल टॉवर उभारणार आहे. या विस्तारामुळे ग्रामीण तसेच दुर्गम भागातील नेटवर्क कव्हरेज सुधारण्याची अपेक्षा आहे.

BSNLकडून देशभरात मोठ्या प्रमाणावर ४G मोबाइल साइट्स उभारण्याचे काम सुरू आहे. सरकारच्या मते, नेटवर्कचा पुढील विस्तार टेक्नो–कमर्शियल व्यवहार्यतेनुसार करण्यात येणार आहे.

नवीन नेटवर्कमुळे BSNL ग्राहकांना कॉल ड्रॉप, कमजोर सिग्नल आणि नो–नेटवर्कसारख्या समस्यांमध्ये दिलासा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, प्रत्येक भागात नेटवर्कची गुणवत्ता समान असेलच असे नाही; प्रत्यक्ष अनुभव स्थानिक कव्हरेज आणि नेटवर्क क्षमतेवर अवलंबून राहणार आहे.

BSNLच्या ४G नेटवर्कची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, त्यातील तंत्रज्ञान ५Gसाठी अपग्रेड करण्यायोग्य आहे. सरकारने संसदेत दिलेल्या माहितीनुसार, BSNLने सुरुवातीला ४G नेटवर्क उभारण्यावर भर दिला असून त्यानंतर ५G सेवा सुरू करण्याची योजना आहे. BSNLच्या दीर्घकालीन योजनेनुसार ३८,८२५ ४G साइट्स ५Gमध्ये अपग्रेड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

नेटवर्क विस्ताराचा फायदा BSNLच्या ग्राहकसंख्येलाही होत असल्याचे सरकारी आकडेवारीतून दिसून येते. BSNLचा ग्राहक आधार मार्च २०२४मधील ८.८६ कोटींवरून डिसेंबर २०२५मध्ये ९.२८ कोटींवर पोहोचला होता. म्हणजेच या कालावधीत BSNLच्या ग्राहकसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. आगामी काळात ४G नेटवर्कचा विस्तार झाल्यास कंपनीला आणखी ग्राहक आकर्षित करण्याची संधी मिळू शकते.

# महान स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस

नेताजी म्हणून प्रसिद्ध असलेले सुभाषचंद्र बोस हे एक महान लढाऊ, स्वातंत्र्यसैनिक आणि देशभक्त होते. जेव्हा आपण सुभाषचंद्र बोस हे नाव ऐकतो तेव्हा आपल्या मनात पहिली गोष्ट येते ती म्हणजे तुम मुझे खून दो में तुम्हे आझादी दूंगा ही त्यांची लोकप्रिय म्हण. आज त्यांचा स्मृतिदिन, त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...



## निमित्त

स्वातंत्र्य चळवळीचे महान नेते सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिसातील कटक येथील प्रसिद्ध वकील जानकी नाथ आणि प्रभावती देवी यांच्या पोटी झाला. इंग्रजांच्या दडपशाहीच्या निषेधार्थ त्यांच्या वडिलांनी 'रायबहादूर' ही पदवी परत केली. त्यामुळे सुभाषच्या मनात इंग्रजांबद्दल कटुता रुजली. आता सुभाष यांनी इंग्रजांना भारतातून हुसकावून लावण्याची आणि भारताला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा घेतली आणि राष्ट्रवादाच्या मार्गावर चालू लागले. आयसीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सुभाष यांनी आयसीएसचा राजीनामा दिला. या गोष्टीवर त्यांच्या वडिलांनी त्यांचे मनोबल वाढवले आणि सांगितले 'तुम्ही देशसेवेचे व्रत घेतले आहे, तेव्हा या मार्गापासून कधीही विचलित होऊ नका.'

डिसेंबर १९२७मध्ये काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस बनल्यानंतर १९३८मध्ये त्यांची काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली. ते म्हणाले होते, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली आपण स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे ही माझी इच्छा आहे. आमचा लढा केवळ ब्रिटीश साम्राज्यवादाविरुद्ध नाही, तर जागतिक साम्राज्यवादाविरुद्ध आहे, मात्र हळुहळू सुभाष यांचा काँग्रेसशी भ्रमनिरास होऊ लागला.


१६ मार्च १९३९ रोजी सुभाष यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. स्वातंत्र्य चळवळीला नवा मार्ग देत सुभाष यांनी तरुणांना संघटित करण्याचा प्रयत्न पूर्ण निष्ठेने सुरू केला. त्याची सुरुवात ४ जुलै १९४३ रोजी सिंगापूर येथे झालेल्या भारतीय स्वातंत्र्य परिषदेने झाली.

५ जुलै १९४३ रोजी आझाद हिंद फौजची औपचारिक स्थापना झाली. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी आशियातील विविध देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांची परिषद भरवून आणि तात्पुरते स्वतंत्र भारत सरकार स्थापन करून स्वातंत्र्य मिळवण्याचा आपला संकल्प पूर्ण केला.

१२ सप्टेंबर १९४४ रोजी रंगूनच्या ज्युबली हॉलमध्ये हुतात्मा यतिंद्र दास यांच्या स्मृतीदिनानिमित्त नेताजी यांनी अतिशय भावविभोर भाषण केले आणि ते म्हणाले 'आता आपले स्वातंत्र्य निश्चित आहे, परंतु स्वातंत्र्य बलिदानाची मागणी करते. तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन.' भारताच्या इतिहासातच नव्हे; तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेलेले हे वाक्य देशातील तरूणाईत प्राण फुंकणारे होते.

१६ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजींचे विमान टोकियोला निघताना तायहोकू विमानतळावर कोसळले आणि १८ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र भारताच्या अमरत्वाची घोषणा करणारे, भारतमातेचे लाडके नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निधन झाले, परंतु देशभक्तीचा दिव्य प्रकाश प्रज्वलित करून अमर झाले. (साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### रात्री झोप येण्यासाठी 'या' गोष्टी करा...

झोप ही आपल्या दैनंदिन जीवनातील सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. झोप पूर्ण झाल्यावर शरीर, मन ताजेतवाने राहते, मात्र अनेक वेळा झोप पूर्ण झाल्यानंतरही शरीरात थोडीशी सुस्ती राहते. काही जणांना झोपण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स कॅम्पमध्ये काम करणारे स्पोर्टस् फिजिओथेरपिस्ट डॉक्टर सुधांशु राय यांनी काही उपाय सुचवले आहेत, जे कदाचित तुम्हाला मदत करू शकतील.



रात्री कॉफी पिऊ नका – दुपारी १२ नंतर कॉफी अजिबात पिऊ नका. कॅफिनचे आयुष्य ५ ते ६ तास असते. तुम्ही दुपारी ३ नंतर घेतलेली कॉफी तुमच्या झोपेच्या वेळेत, मेलाटोनिनच्या उत्पादनात व्यत्यय आणू शकते.

स्क्रीन टाइम – रात्री ८.३०नंतर टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप बघू नका. फोनमधून येणारा निळा प्रकाश मेलाटोनिन सोडण्यात अडथळा आणतो. त्यामुळे ठरावीक वेळेनंतर रात्री मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप न बघणे तुमच्या मेंदूला नैसर्गिकरीत्या विश्रांती घेण्यास मदत करील.

रात्री १ केळी + १ चमचा तूप खा – केळ्यामध्ये मॅग्नेशियम, ट्रिप्टोफॅन (मेलाटोनिन व सेरोटोनिन) भरपूर प्रमाणात असते आणि तूप रक्तातील साखर स्थिर करण्यास मदत करते. त्यामुळे रात्रीच्या वेळी तुम्हाला झोपेतून जागे करणाऱ्या कॉर्टिसोलच्या वाढीस प्रतिबंध घालता येतो.

विपरीत करणी आसन – विपरीत करणी आसन म्हणजे पाय भिंतीला टेकवून ठेवणे. हे आसन शरीराचा पॅरासिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय करते, हृदय गती कमी करते व मन शांत ठेवते. क्लिनिकल चाचण्यांमधून असे दिसून आले आहे की, हे आसन केल्याने झोप यायला लागणारा वेळ कमी होतो आणि चांगली झोप लागते.

नैसर्गिक वातावरणातील आवाज ऐका – अभ्यासातून असे दिसून आले आहे की, नैसर्गिक वातावरणातील सौम्य आवाज झोपेत अडथळा येऊ देत नाहीत.

खोलीचे तापमान – २४ अंश सेल्सिअस असे थंड वातावरण तुमच्या शरीराचे मूळ तापमान कमी करण्यास मदत करते. शरीराद्वारे मेलाटोनिन सोडण्यासाठी आणि गाढ झोपेसाठी हा एक नैसर्गिक उपाय आहे.

७:३०पर्यंत जेवा – उशिरा जेवण केल्याने इन्सुलिन आणि मेलाटोनिनच्या वेळेत व्यत्यय येतो. लवकर जेवल्याने तुमच्या सर्केडियन बायोलॉजीशी जुळतो आणि चांगली झोप येईल.

# पनवेल महानगरपालिका

## जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी – 1 नमुन्यात मागवीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. (Without GST) | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत + 18% विक्री कर = एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.01 रोहिंजण गाव (आरोग्य केंद्राजवळ) कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/74/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 2. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.01, रोहिंजण नवीन वसाहत येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/75/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 3. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.01, धरणा गाव येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/76/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 4. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.01, धानसर गाव येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/77/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 5. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.01, सिद्धीकरवले गाव येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/78/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 6. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.01, कोयनावेळे मुख्य रस्त्यालगत येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/79/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 7. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.01, घोट (भोईरवाडा) येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/80/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 8. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.01, घोटकॅम्प-कोयनावेळे येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/81/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 9. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.01, घोट गाव (हॅप्पी होम्सच्या बाजूला) कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/82/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 10. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 01, तळोजा फेज - 2 सेक्टर 25 जवळील ग्राऊंड येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/83/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 11. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 01, तळोजा फेज - 2 सेक्टर 37 धनश्री सोसायटीच्या बाजूला कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/84/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 01, तळोजा फेज - 2 सेक्टर 23 जवळील गार्डन येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/85/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 13. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 01, तळोजा फेज - 2 सेक्टर 22 प्लॉट नं. 01 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/86/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 14. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 01, तळोजा फेज - 2 सेक्टर 36, भूखंड क्र 02 आनंदसागर - दीपसागर सोसायटी जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/87/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 15. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 01, तळोजा फेज - 2 सेक्टर 19, भूखंड क्र 04 प्ले ग्राऊंड जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/88/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 16. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 01, तळोजा फेज - 2 सेक्टर 19, भूखंड क्र 20 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/89/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 17. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03, तळोजा फेज - 1 (पेठाली घाटजवळ) कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/90/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 18. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03, तळोजा फेज - 1 आयेशा हॉटेल जवळील ग्राऊंड येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/91/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 19. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.02, नावडे फेज- 2 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे(PMC/CE/92/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 20. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.02, पडघे गाव येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/93/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 21. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.02, पालेखुर्द गाव येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/94/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 22. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.02, ढोंगऱ्याचा पाडा येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/95/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 23. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03, खारघर, सेक्टर 34, साई मन्नत सोसायटी जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे (PMC/CE/96/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 24. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03, खारघर मधील सेक्टर-35, प्लॉट नं.01 हाईड पार्क सोसायटी जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/97/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 25. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03, खारघर मधील सेक्टर-24 मुर्बी गणेश घाट या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/98/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 26. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03, खारघर मधील सेक्टर-30, प्लॉट नं.63ए, C.I.S.F. समोर कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/99/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 27. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03,खारघर मधील सेक्टर-36, स्वप्नपुर्ती - व्हॅली शिल्प जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/100/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 28. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03, खारघर मधील सेक्टर-27, रांजणपाडा गावा जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/101/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 29. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03, खारघर मधील सेक्टर-40, बागेश्री सोसायटी समोर कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/102/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 30. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 03, खारघर मधील ओवे कॅम्प गावाजवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/103/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 31. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.04, खारघर मधील सेक्टर-14, कामधेनू इतारती समोर कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/104/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 32. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.04, खारघर मधील सेक्टर-20, प्लॉट नं.28 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/105/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 33. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.04, खारघर, सेक्टर-21 ग्रामविकास भवन जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/106/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 34. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.04, खारघर मधील सेक्टर-19, प्लॉट नं.98 /99 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/107/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 35. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.04, खारघर मधील सेक्टर-13, प्लॉट नं.40 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/108/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 36. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 4, खारघर मधील सेक्टर-20, प्लॉट नं.7/8 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/109/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 37. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 4, खारघर मधील सेक्टर-21, प्लॉट नं.24 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/110/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 38. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 4, खारघर मधील सेक्टर-14, स्मशानभूमीच्या मागील मैदानात कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/111/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 39. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.05, खारघर मधील सेक्टर-12, प्लॉट नं.58 बी या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/112/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 40. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.05, खारघर मधील गावदेवी मैदान जवळ सेक्टर-12 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/113/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 41. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.05, खारघर मधील सेक्टर-07, प्लॉट नं.19 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/114/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 42. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.05, खारघर मधील सेक्टर-06, प्लॉट नं.10ए या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/115/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 43. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.05, खारघर मधील उत्सव चौक समोरील प्लॉट नं.2अ, सेक्टर-04 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/116/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 44. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.05, खारघर मधील सेक्टर-12, संजीवणी हॉस्पीटल जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/117/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 45. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 06, खारघर मधील सेक्टर-08, प्लॉट नं.01 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/118/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 46. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 06, खारघर मधील स्वर्ण गंगा ज्वेलर्स जवळ सेक्टर-15 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/119/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 47. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 06, खारघर (कोपरा) येथील साई प्रसाद रेसिडेन्सी शेजारील सेक्टर-10, प्लॉट नं.252 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/120/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| **48.** | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 06, खारघर मधील सेक्टर-16, प्लॉट नं.3बी येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/121/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 49. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 06, खारघर मधील सेक्टर-18, प्लॉट नं.37 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/122/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 50. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 06, खारघर मधील सेक्टर-17, सेलेब्रेशन सोसायटी जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/123/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 51. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 06, खारघर मधील सेक्टर-11, खेळाचे मैदान या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/124/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 52. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.07, सेक्टर -17,प्लॉट नं.04 कळंबोली येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/125/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 53. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.07, सेक्टर -11, प्लॉट नं. 14 व 15 कळंबोली येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/126/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |

पान ७ वर

## पाम बीच रोडवरील वाहतूक कोंडी फुटणार

# उड्डाणपूल उभारण्याच्या हालचाली

## आयआयटी बॉम्बेशी मनपा करणार सल्लमसलत

**नवी मुंबई : बातमीदार**

पाम बीच रोडवरील सातत्याने वाढणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सानपाड्यासह प्रमुख जंक्शनवर उड्डाणपूल उभारण्याच्या पर्यायाचा अभ्यास करण्यास नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सहमती दर्शविली आहे. या उड्डाणपुलांमुळे या महत्त्वाच्या मार्गावरील अनेक सिग्नल टाळून मुख्य वाहतूक सुरळीतपणे पुढे जाणे शक्य होऊ शकते.

सत्ताधारी भाजपचे आमदार ॲड. निरंजन डावखरे आणि नॅटकनेक्ट फाउंडेशनच्या क्लायमेट ॲक्शन नाऊ (कॅन) फॉर एमएमआर (मुंबई महानगर प्रदेश) या व्यासपीठाने पाम बीच रोडवरील वाढती वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली होती.

नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार आणि पाम बीच ग्रीन्सचे संयोजक श्रीकांत पतकी यांनी शुक्रवारी सायंकाळी डॉ. शिंदे यांची भेट घेऊन प्रस्तावित उड्डाणपुलांमुळे मुख्य वाहतुकीला सात सिग्नलवर थांबावे न लागता सुरळीतपणे पुढे जाता येईल, याकडे लक्ष वेधले. त्यामुळे चौकांवरील प्रतीक्षा वेळ कमी होऊन पाम बीच रोडवर वाहनांची साचणारी कोंडी टाळण्यास मदत होऊ शकते.



डॉ. शिंदे यांनी ॲड. डावखरे आणि नॅटकनेक्टच्या कॅनच्या निवेदनांची दखल घेत उड्डाणपुलांच्या पर्यायाचा निश्चितपणे विचार करण्याचे आश्वासन दिले. पाम बीच रोडवरील वाहतूक प्रश्नावर मनपा आधीच आयआयटी-बॉम्बेशी संपर्कात असून या प्रस्तावाबाबतही संस्थेचे तांत्रिक मत घेण्याची शक्यता आहे.

कुमार आणि पतकी यांनी यापूर्वी सत्ताधारी भाजपचे विधानपरिषद सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांची भेट घेतली होती. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि पालघर या पाच जिल्ह्यांत विस्तारलेल्या कोकण पदवीधर मतदारसंघाचे ते प्रतिनिधित्व करतात. या भेटीत विविध पर्यावरणीय प्रश्नांवर चर्चा झाली होती. त्यानंतर डावखरे यांनी पाम बीच रोडवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न मनपा आयुक्तांकडे मांडला.

पाम बीच रोडवर मोठ्या प्रमाणावर आंतरशहरी वाहतूकही असते. पुणे, अलिबाग आणि गोव्याच्या दिशेने जाणारी हजारो वाहने वाशी येथे सायन-पनवेल महामार्गावरून वळसा घेऊन पाम बीच रोडचा वापर करतात. या वाहनांना मार्गावरील अनेक सिग्नलवर थांबावे लागत असल्याने आधीच वाढलेल्या वाहतूक भारात आणखी भर पडते.

प्रस्तावित उड्डाणपुलांमुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या आणि विमानतळावरून येणाऱ्या वाहतुकीलाही मोठा दिलासा मिळणार आहे. विमानतळ सुरू झाल्यानंतर या मार्गावरील वाहतूक वाढणार असल्याने सिग्नलमुक्त वाहतूक अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

स्थानिक वाहतूक विद्यमान चौकांमधून सुरू ठेवून मुख्य वाहतुकीसाठी सिग्नलमुक्त मार्ग उपलब्ध करून दिल्यास कोंडी, इंधनाचा अपव्यय आणि वाहनांमधून होणारे उत्सर्जन कमी करण्यास मदत होऊ शकते, असे पर्यावरणवादी संघटनांनी म्हटले.

कुमार यांनी पाम बीच रोडवरील वाढत्या कोंडीकडे लक्ष वेधताना वाशी आणि नेरूळदरम्यानचा मोराज जंक्शन हा मोठा वाहतूक अडथळा असल्याचे सांगितले. नेरूळ, टी.एस. चाणक्य, अक्षर आणि एनआरआय सीवूड्स या जंक्शनवरील वाहतूक समस्यांकडेही निवेदनात लक्ष वेधण्यात आले होते.

मोराज जंक्शनवरील कोंडीमुळे वाहनचालकांना मोठा विलंब सहन करावा लागतो, इंधनाचा अपव्यय होतो आणि हजारो प्रवाशांना त्रास सहन करावा लागतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले होते. उत्तर आणि दक्षिण दिशेने जाणाऱ्या मुख्य वाहतुकीसाठी थेट उड्डाणपूल उभारल्यास सिग्नलमुक्त वाहतूक, प्रवासाचा वेळ कमी होणे आणि रस्ते सुरक्षेत सुधारणा होऊ शकते, अशी मागणी करण्यात आली होती.

पाम बीच रोड हा नवी मुंबईसाठी महत्त्वाचा उत्तर-दक्षिण मार्ग असून मुंबई-पुणे परिसर तसेच किनारी भागांकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठीही तो महत्त्वाचा मार्ग बनला आहे, असे पतकी यांनी सांगितले.

"मुख्य वाहतूक आणि स्थानिक चौकांमधील वाहतूक वेगळी करणे हा यामागचा उद्देश आहे. वाशी येथे सायन-पनवेल महामार्गावरून वळल्यानंतर पुणे, अलिबाग आणि गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना पाम बीच रोडवरील प्रत्येक सिग्नलवर थांबावे लागू नये," असे कुमार म्हणाले.

## सराईत रिक्षाचोराला बेड्या; चार गुन्हे उघडकीस

### कोपरखैरणे पोलिसांची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेलेल्या ऑटो रिक्षेचा तपास करताना कोपरखैरणे पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने सराईत रिक्षा चोराच्या मुसक्या आवळल्या आहेत. निलेश सुभाष पाटील (वय ३५), रा. एपीएमसी मार्केट, दाना बंदर, वाशी, मूळ रा. सातारा, असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून नवी मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून चोरीला गेलेल्या २ लाख ९५ हजार रुपये किमतीच्या चार ऑटो रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे रिक्षा चोरीचे चार गुन्हे उघडकीस आले आहेत.

१० ऑगस्ट २०२६ रोजी सेक्टर २, कोपरखैरणे येथील विद्या भवन सोसायटीमधून रमेश गुप्ता यांची MH ४३ AC ५८९३ क्रमांकाची सुमारे एक लाख रुपये किमतीची ऑटो रिक्षा चोरीला गेली होती. याप्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक मयुरेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी सुरू केली. दरम्यान, १५ ऑगस्ट रोजी सेक्टर १९, वैकुंठ धामजवळ गस्त घालत असताना संशयित निलेश पाटील पोलिसांना पाहून रिक्षा सोडून पळू लागला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडील रिक्षा चोरीची असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

पोलीस ठाण्यात चौकशी केल्यानंतर आरोपीने अन्य रिक्षा चोरल्याची माहिती दिली. त्याच्या निवेदनावरून पोलिसांनी कोपरखैरणे हद्दीतून दोन, वाशी हद्दीतून एक आणि रबाळे हद्दीतून एक, अशा एकूण चार चोरीच्या रिक्षा हस्तगत केल्या. त्यांची एकूण किंमत २ लाख ९५ हजार रुपये आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) उन्मेष थिटे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. मयुरेश शिंदे, पोलीस अंमलदार चिकणे, कटके, कानवडे, साळुंखे आणि वाघ यांच्या पथकाने केली.



## तुर्भे पोलिसांनी ४१ मोबाईल मूळ मालकांना केले परत

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीस गेलेल्या व गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा तांत्रिक तपास करून तुर्भे पोलिसांनी तब्बल ४१ मोबाईल शोधून काढण्यात यश मिळवले आहे. हस्तगत करण्यात आलेल्या या मोबाईल फोनची एकूण किंमत ९ लाख ५० हजार ८०० रुपये आहे. काल १५ ऑगस्ट रोजी हे मोबाईल तक्रारदारांना सन्मानपूर्वक परत करण्यात आले.

पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक (पोना/३१६६) रोहित राठोड यांनी या सर्व प्रकरणाचा तांत्रिक तपास व सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. भारताच्या विविध राज्यांमध्ये ट्रेस झालेल्या विविधांगी ४१ कंपन्यांच्या मोबाईल फोनचा शोध घेऊन त्यांनी हे हँडसेट हस्तगत केल होते.

राम प्रहर श्रावणधारा

### प्रणयी श्रावण

तिच्या पायीच्या पैंजणांनी
अलवार रुणुझुणावं ना
तसाच येतोस रिमझिमत
तो ! असलास ना श्रावणा !
तरी अलवार सरी सांडतोस तू
इंद्राच्या हारातले मोती
वसुंधरेवर पेरून जातोस
मोत्यांनी शृंगारते धरा
रानफुलांनी कूस तिची
जणू उजवून जातोस
शालू हिरवा नव्हाळीचा
अवनीला नेसवून जातोस
रवी किरणांच्या बाहूपाषातला
चंद्रवर्खी सरींचा प्रणयखेळ
किरमीजी चंदेरी रंगात रंगवतोस !
अन् सप्तरंगी इंद्रधनुची
आसमंती उधळण करतोस
स्वर्गच जणू धरित्रीच्या
दारी आणून उभा करतोस तू
ऊन पावसाचा करून खेळ
दाखवतोस सुखदुःख्खाचा मेळ
जीवनइंगीत सांगून जातोस तोही तूच !!



-लतिका गांगल,
रसायनी


॥ श्री वरदविनायक प्रसन्न ॥



For Online Donations : State Bank of India,
A/C Name- Shree Ganpati Sansthan, Mahad, Branch - Khopoli.
Saving A/C No. 11339614777, IFSC Code - SBIN0005551 UPI-8879993444
Email Donation Details to : varadvinayakmahad@yahoo.com

श्री गणपती संस्थान, महड
ता.खालापूर, जि.रायगड

श्रावण महिना विशेष पुजा

(पहिला मंगळवार दि.१८ ऑगस्ट २०२६)
- दुर्वार्चन पूजा व सहस्रावर्तने | दुर्वांची वाडी

(दुसरा मंगळवार दि.२५ ऑगस्ट २०२६)
- सिंदुरार्चन पूजा व सहस्रावर्तने | झेंडूफुलांची वाडी

(तिसरा सोमवार दि.३१ ऑगस्ट २०२६)
(संकष्टी चतुर्थी)
- मोदकार्चन पूजा आणि श्री गणेश याग | ऑर्किड फुलांची वाडी

(तिसरा मंगळवार दि.०१ सप्टेंबर २०२६)
- फलार्चन पुजा व सहस्रावर्तने | फळांची वाडी

(चौथा सोमवार दि.०७ सप्टेंबर २०२६)
श्रावण सोमवार निमित्त श्री लघुरुद्र तसेच श्रावण एकादशी निमित्त श्री राधा पुरुषोत्तम याग

(चौथा मंगळवार दि.०८ सप्टेंबर २०२६)
- लाडू अर्चन पूजा व सहस्रावर्तने | शेवंती फुलांची वाडी

श्रावण महिन्यातील विशेष पूजांमध्ये सहभागी होण्याकरता काउंटर अथवा कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच श्री गणेश याग आणि श्री राधा पुरुषोत्तम याग आणि श्री लघुरुद्र यामध्ये प्रत्यक्ष सहभागी होण्याकरता कार्यालयाशी संपर्क साधावा.

विश्वस्त मंडळ
श्री गणपती संस्थान महड

भक्तनिवास बुकींगसाठी मो.: ७२७६४ ७३८५४

## ना. भरत गोगावले रायगडचे पालकमंत्री

# शिवसैनिकांनी केला जल्लोष



**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून मंत्री भरत गोगावले यांची निवड जाहीर झाली आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने अधिकृत पत्र जारी केल्यानंतर पोलादपूर तालुक्यातील शिवसेना, युवासेना पदाधिकाऱ्यांनी जल्लोष करीत एकमेकांना लाडू भरवून आनंद साजरा केला.

ना. गोगावले यांची रायगडचे पालकमंत्री म्हणून अधिकृत नियुक्ती झाल्याचे जाहीर होताच पोलादपूर तालुक्यातील शिवसैनिक व युवासैनिकांनी फटाके फोडून तसेच नागरिकांना लाडू वाटप करून जल्लोष साजरा केला.

यावेळी तालुकाप्रमुख निलेश अहिरे, पं.स. सभापती अविनाश शिंदे, उपसभापती अनिता भिलारे, शहरप्रमुख सुरेश पवार, स्वकीय सचिव सुशांत जगताप, पं.स.सदस्य अनिल दळवी, नगरसेवक नागेश पवार, विनायक दीक्षित, प्रसाद इंगवले, युवा सेना अध्यक्ष विक्रम भिलारे, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, उद्योजक रामदास कळंबे, तानाजी निकम, नारायण साने, प्रकाश गायकवाड, जितेंद्र सकपाळ, राजू धुमाळ, उपशहरप्रमुख निलेश पवार, निलेश कंक, अनिल भिलारे, राजेश डांगे, सतीश शिंदे, गणेश उतेकर, कार्यालय संपर्क प्रमुख सुनील तळेकर आदी शिवसैनिक, युवा सैनिक, महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**माणगाव :** महाड–पोलादपूर–माणगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन आणि खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांची रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीची घोषणा होताच महाड, पोलादपूर आणि माणगाव तालुक्यात शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

ना. भरत गोगावले यांची रायगडच्या पालकमंत्रिपदी नियुक्ती झाल्याची अधिकृत माहिती समोर येताच माणगाव शहरात शिवसेना व युवासेना पदाधिकाऱ्यांनी बसस्थानकासमोर जल्लोष केला. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली तसेच उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवत आनंद व्यक्त केला.

ना. गोगावले यांच्या नियुक्तीमुळे रायगड जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला. विशेषतः माणगाव, महाड आणि पोलादपूरसह रायगडच्या ग्रामीण भागातील प्रलंबित विकासकामांना चालना मिळावी, रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, रोजगार, पर्यटन तसेच पायाभूत सुविधांच्या प्रश्नांना प्राधान्य मिळावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



**तळा :** मंत्री भरत गोगावले यांची पालकमंत्रिपदी नियुक्ती झाल्याचे समजताच तळा शहरातील बळीच्या नाक्यावर शिवसेनेच्या गोटात फटाके वाजवून व तोंड गोड करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर आनंद पहावयास मिळाला.

उपस्थित पदाधिकारी म्हणाले की, आमचे आज स्वप्न पुर्ण झाले. आज आमच्या नेत्याला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला. यावेळी पक्षप्रमुख प्रद्युम्न ठसाळ, शहरप्रमुख राकेश वडके, ज्येष्ठ नेते रविभाऊ मुंढे, माजी नगराध्यक्ष रेश्मा मुंढे, नगरसेवक लीलाधर खातू, नरेश सुर्वे, मंगेश पोळेकर, रितेश मुंढे, नगरसेविका नेहा पांढरकामे, नमित पांढरकामे, धनराज गायकवाड, भास्कर गोळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी जल्लोष केला.

**महाड : प्रतिनिधी**

रायगडच्या पालकमंत्रिपदावर अखेर पडदा पडला आहे. सातत्याने जे पद हुकत होते ते मिळाल्याने मंत्री भरत गोगावले यांनी समाधान व्यक्त केले आहे, तर शासकीय आदेश जाहीर झाल्यानंतर महाडसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

महाडचे भरत गोगावले हे तीन वेळा आपल्या मतदारसंघात निवडून आले आहेत. शिंदे सरकार स्थापन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्या मंत्रिमंडळात भरत गोगावले यांना स्थान मिळेल अशी आशा महाडकरांना होती, पण स्पर्धेमुळे मंत्रिपदासाठीही गोगावले यांना प्रतीक्षा करावी लागली होती. त्यानंतर त्यांना मंत्रीपद देण्यात आले आणि लवकरच पालकमंत्रीदेखील केले जाईल याबाबत महाड शहर आणि संपूर्ण रायगड जिल्ह्याला आशा होत्या. १५ ऑगस्टपूर्वी गोगावले यांनी आपल्यालाच पालकमंत्रीपद मिळेल अशी आशा व्यक्त केली. तदनंतर झालेल्या बैठकीत ध्वजारोहण करण्याचा मान देण्यात आला. त्यावेळीदेखील कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष व्यक्त केला होता. ध्वजारोहणाचा मान दिल्यानंतर पालकमंत्री पदाची घोषणा करणे राखून ठेवण्यात आले होते. ही घोषणा अखेर शासकीय आदेशान्वये करण्यात आली.

रायगडचे पालकमंत्रीपद गोगावले यांना देण्यात आल्यानंतर महाडमध्ये कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष व्यक्त केला. बाजारपेठेतून गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला. कार्यकर्त्यांनी एकमेकांनादेखील शुभेच्छा देत समाधान व्यक्त केले.



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल. पिनकोड–४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.com
**दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२–२७४६७४४०**

**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. १६ (ई-निविदा) सन २०२६-२७**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२– २७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरिता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप** – या निविदेमध्ये एकूण ३ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १८.०८.२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक २५.०८.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :– १७/०८/२०२६

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे –
मौजे डोलवहाळ, ता. रोहा, जि. रायगड येथिल.......

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| कैजाद सोहराब श्रॉफ | ३७ | जिरायत ००–३४–९०<br>पो.ख. ००–०९–६०<br>एकुण ००–४४–५० | ३.३१ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, अ‍ॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (३०) तीस दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.१८/०८/२०२६

**सही**
**अ‍ॅड.पी.जी. दाभाडे**
**रा. फ्लॅट नं.४०२, बी.वींग, चौथा मजला, साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर, डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२१०९**
**मोबा नं. ९२७२७१३९५६**

## निविदा सूचना

**पुनर्विकासासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्ती**

**तीर्थराज को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि.**, पीएल–५B, इमारत क्र. १ ते २०, प्लॉट क्र. ३, सेक्टर–९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१०२०६, ही संस्था **सिडकोद्वारे सुमारे ११, ६२०. ३२ चौ.** मी. जमिनीवर बांधण्यात आलेल्या **२० निवासी इमारती आणि ३२० निवासी युनिट्सच्या** प्रस्तावित पुनर्विकासासाठी सर्वसमावेशक PMC सेवा पुरवण्याकरिता **पनवेल, नवी मुंबई आणि मुंबई** येथील प्रतिष्ठित, अनुभवी आणि पात्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार PMC संस्थांकडून सीलबंद तांत्रिक आणि व्यावसायिक निविदा (Bids) मागवत आहे. कामाचे स्वरूप निविदा दस्तऐवजात सविस्तर नमूद केले आहे.

निविदा दस्ताची किंमतः रु. २५,०००/–
(निविदेचे शुल्क **'Tirthraj Sahakari Grahnirman Sanstha Ltd'** यांच्या नावे केवळ डीडीद्वारेच (DD) भरणा करावा)

निविदा प्राप्त करण्याची तारीख: १९/०८/२०२६

निविदा प्राप्त करण्याची अंतिम तारीखः १३/०९/२०२६

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ ०४/१०/२०२६ रोजी रात्री ८:३० वाजेपर्यंत

तांत्रिक निविदा उघडण्याची वेळ: ११/१०/२०२६ रोजी संध्याकाळी ७:०० वाजता

**सही/–**
**सचिव**
**रमेश मोकल**
**९६१०५९५००३**

**सही/–**
**खजिनदार**
**बबन फराड**
**९८६९४५१५१६**

स्थळ: सोसायटी कार्यालय, तीर्थराज सोसायटी लि.
सोसायटीचा ईमेल आयडी :– tirtharajredevelopment@gmail.com

पान ५ वरुन

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 54. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.07, सेक्टर -1, प्लॉट नं. 28, कळंबोली येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/127/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 55. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 09, नवीन पनवेल मधील गुरुद्वारा जवळील सेक्टर-5अ, प्लॉट नं.1 अ या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/128/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 56. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 11, कामोठे मधील सेक्टर-21, प्लॉट नं.33 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/129/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 57. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 11, कामोठे, सेक्टर-22 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/130/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 58. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 11, कामोठे मधील सेक्टर-09, प्लॉट नं.10 ऐश्वर्या हॉटेल जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/131/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 59. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.11, कामोठे, सेक्टर-06, प्लॉट नं.23 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/132/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 60. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.11, कामोठे येथील नौपाडा गावाजवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/133/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 61. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.12, कामोठे, सेक्टर-11, प्लॉट नं.36 (सुषमा पाटील स्कूल जवळ) कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/134/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 62. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 13, कामोठे मधील सेक्टर-32, प्लॉट नं.01 जुई गाव रोड या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/135/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 63. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.13, कामोठे, सेक्टर-35 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/136/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 64. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.13, कामोठे, सेक्टर-35, प्लॉट नं.54 (मॅंगो गार्डन) येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/137/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 65. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.13, कामोठे, सेक्टर-19, प्लॉट नं.14 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/138/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 66. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.14, कामोठे, सेक्टर-25, प्लॉट नं.27 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/139/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 67. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 14, अं.भु.क्र.538 तालुका क्रीडासंकुल, एच.ओ.सी. कॉलनी जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/140/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 68. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.14,अं.भु.क्र.36-1, आदर्श सोसायटी, बंदर रोड येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/141/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 69. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 14, अं.भु.क्र.797/1/1 साईनगर पनवेल येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/142/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 70. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 16, नविन पनवेल सेक्टर-05, प्लॉट नं.53/54 (डी-मार्ट समोर) कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/143/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 71. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 16, नविन पनवेल सेक्टर-11, प्लॉट नं.28 येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/144/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 72. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 17, नविन पनवेल येथील संत साईबाबा शाळा येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/145/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 73. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र. 18, नवीन पनवेल मधील शांतीनिकेतन पब्लिक स्कुल जवळील प्लॉट नं.36, सेक्टर-2 या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/146/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 74. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.18 अं.भु.क्र.122 (विरुपक्ष हॉलच्या बाजूला) येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/147/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 75. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.18 प्लॉट नं.9ए, सेक्टर-12, खांदा कॉलनी येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/148/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 76. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.19 पनवेल, अं.भु.क्र.188 गुणे हॉस्पिटल शेजारी कृत्रिम तलाव तयार करणे व विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/149/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |
| 77. | गणेशोत्सव 2026 करीता प्रभाग क्र.19 अं.भू.क्र.273 पार्ट मार्केट यार्ड, पाण्याच्या टाकीच्या बाजूला कृत्रिम तलाव तयार करणे व विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/150/2026-27) | ४,५६,१८९/- | ४,६००/- | ५००+ ९० = ५९० | १५ दिवस |

याकामी कोरी निविदा दिनांक 18/08/2026 पासुन दि. 31/08/2026 पर्यंत सांय. 5.00 वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

1) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफट निविदेसोबत लखोटा क्र. 1 मध्ये सादर करण्याचा आहे.
2) सीलबंद निविदा दि.01/09/2026 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.
3) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि.01/09/2026 रोजी दुपारी 3.30 वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
4) कोरी निविदा मिळणेकामी अर्ज सादर करताना ठेकेदाराने सोबत ठेकेदार नोंदणी प्रमाणपत्र अथवा गणेश विसर्जनाकरीता उपाययोजना करणेच्या कामाचा अनुभवाचा दाखला, जीएसटी, पॅन ही कागदपत्रे अर्ज पत्रासोबत जोडणे बंधनकारक आहे. तसेच तांत्रिक लिफाफ्यामध्ये वरील तांत्रिक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

प्राप्त निविदेतील 1 अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.२६१/२८४/२०२६
दिनांक : १७/०८/२०२६

**(सही/–)**
**अतिरिक्त आयुक्त = I**
**पनवेल महानगरपालिका**

# लंकेचा पहिला डाव २८४ धावांत आटोपला

## भारताकडे १७८ धावांची आघाडी; मानव सुथारचे चार बळी

**गॉल : वृत्तसंस्था**

गॉल कसोटी सामन्यातील तिसऱ्या दिवसाच्या खेळात श्रीलंकेचा पहिला डाव २८४ धावांत आटोपला. पावसाच्या व्यत्ययामुळे श्रीलंकेचा डाव संपल्यानंतरच तिसऱ्या दिवसाचा खेळ थांबवण्यात आला. भारताने पहिल्या डावात १७८ धावांची भक्कम आघाडी घेतली आहे. त्यामुळे चौथ्या दिवशी टीम इंडिया ही आघाडी आणखी वाढवून श्रीलंकेसमोर मोठे लक्ष्य उभे करण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल.

तिसऱ्या दिवशी भारतीय संघाने ९ बाद २६० धावांवरून खेळाला सुरुवात केली. अवघ्या चार चेंडूंचा सामना केल्यावर दोन धावांची भर घालून प्रसिद्ध कृष्णाच्या विकेटसह भारतीय संघाचा पहिला डाव ४६२ धावांवर संपुष्टात आला. या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना यजमान श्रीलंकेची सुरुवात खराब झाली. पहिल्या सत्राच्या खेळात निम्मा संघ अवघ्या ९० धावांवर तंबूत परतला.

निशान फर्नांडोला खातेही उघडता आले नाही. दिनेश चंडिमल ४ (१६) आणि लाहिरु उदारा २७ (४४) या दोघांना मानव सुथारने



आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवले. लंचआधी कुलदीप यादवने कामिंदू मेंडिसला १४ धावांवर बाद करीत श्रीलंकेला चौथा धक्का दिला, तर त्यानंतर रवींद्र जडेजाने कर्णधार धनंजया डी सिल्वाला २१ धावांवर बाद करत यजमानांना पाचवा धक्का दिला.

संघ अडचणीत असताना सोनल दिनुशा आणि निरोशन डिकवेला जोडी जमली. दोघांनी सहाव्या विकेटसाठी १४६ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. श्रीलंकेच्या धावफलकावर २३६ धावा असताना प्रसिद्ध कृष्णाने ही जोडी फोडली. डिक्वेला ८० धावांवर बाद झाला. सोनल दिनुशा याने आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिले शतक पूर्ण केले.

सहावी विकेट पडल्यावर भारतीय फिरकीतील जादू पुन्हा दिसली. ४८ धावांत चार विकेट्स घेत टीम इंडियाने श्रीलंकेचा डाव २८४ धावांत आटोपला. टीम इंडियाकडून मानव सुथार याने सर्वाधिक चार, रवींद्र जडेजाने तीन, तर कुलदीप यादव, प्रसिद्ध कृष्णा आणि मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

### जडेजाचा महापराक्रम

पहिल्या कसोटी सामन्याचा तिसरा दिवस भारतीय अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजासाठी अत्यंत विशेष आणि ऐतिहासिक ठरला. फलंदाजीत मोठी धावसंख्या उभारता आली नसली, तरी गोलंदाजीत दोन विकेट मिळवत जडेजाने कसोटी क्रिकेटमध्ये असा पराक्रम केला आहे, ज्यामुळे त्याचे नाव जगातील निवडक दिग्गज ऑलराउंडरच्या यादीत सुवर्णअक्षरांनी कोरले गेले आहे. जडेजाने कसोटी क्रिकेटमध्ये चार हजारपेक्षा जास्त धावा आणि ३५०हून अधिक विकेट्स घेण्याचा महापराक्रम पूर्ण केला असून ही दुर्मिळ कामगिरी करणारा तो जगातील फक्त चौथाच ऑलराउंडर ठरला आहे.

# चौलमध्ये जलतरण स्पर्धा

## दिवांशू कुथे प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही रामेश्वर मित्र मंडळाच्या वतीने चौल येथील श्री रामेश्वर पुष्करणीत जलतरण स्पर्धा रंगली. विविध वयोगटांतील स्पर्धकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

स्पर्धेतील गट क्रमांक १ या मुले ओंडके बांधून प्रकारात श्रीयांश अमोल म्हात्रे यांनी प्रथम, वंश रोहित कड द्वितीय, तर ओजस नितीन राऊत यांनी तृतीय क्रमांक मिळविला. गट क्रमांक २ मुले डबल फेरीमध्ये दिवांशू कुथे प्रथम, हर्ष योगेश ठाकूर द्वितीय, तर श्रावण विलास इंद्रे तृतीय आले.

गट ३ मुले सिंगल फेरीमध्ये रियांश मनोज ठाकूर प्रथम, सोहम सुनील घरत द्वितीय व अद्वैत विजय वाघमारे तृतीय; तर गट ४ मुले डबल फेरीमध्ये सार्थक मारुती इंद्रे प्रथम, मयूष मनोज ठाकूर द्वितीय व अंश भोईर तृतीय ठरले.

गट ५ मुली ओंडके बांधून या



प्रकारात आदिश्री हेमंत जाधव प्रथम, ओवी प्रशांत किवळेकर द्वितीय व श्रीषा रोहित पाटील तृतीय; तर गट ६ मुले डबल फेरीमध्ये क्रिश विजय कुथे प्रथम, वेद मंगेश कुथे द्वितीय व मनन जीवन घसे तृतीय आला.

गट ७ मुले सिंगल फेरीमध्ये आयुष शर्मा प्रथम, अर्णव बळीराम पाटील द्वितीय व यश शर्मा तृतीय; तर गट ८ मुले ओंडके बांधून आराध्य आशिष ठाकूर प्रथम, रुद्र विलास जाधव द्वितीय व सानिध्य सुचित वर्तक तृतीय आले.

गट ९ मुली सिंगल फेरीमध्ये तीर्था प्रमोद वाजंगी प्रथम, प्रेषिता पाटील द्वितीय व पलक पाटील तृतीय; तर गट १० मुले सिंगल फेरीमध्ये अर्णव प्रज्वल सकपाळ प्रथम, रुद्र दि. टिवळेकर द्वितीय व जय जितेंद्र म्हात्रे तृतीय आले.

गट ११ मुली ओंडके बांधून श्रीशा संदेश वर्तक प्रथम, ओवी दिलीप धुमाळ द्वितीय व कृतिक आशिष राऊत तृतीय; तर १२ श्री रामेश्वर गटात विनायक यशवंत नाईक प्रथम, जितेंद्र रामचंद्र जाधव द्वितीय व ओमकार प्रशांत जाधव तृतीय क्रमांकावर राहिले.

गट १३ मुले सिंगल फेरीत हर्षवर्धन म्हात्रे प्रथम, संचित स्वप्नील कवळे द्वितीय व निश नागेश पेरेकर तृतीय; तर गट १४ मुली सिंगल फेरीत प्रेक्षिका पाटील प्रथम, सई पिलणकर द्वितीय व आरोही राऊत तृतीय ठरल्या.

गट १५ अंतिम फेरी (तीन फेऱ्या)मध्ये दिवांशू कुथे यांनी प्रथम, रोहित कुथे द्वितीय, प्रेम पाटील तृतीय व सार्थक इंद्रे यांनी चौथा क्रमांक पटकावला. विजेत्यांना गौरविण्यात आले.

# मँचेस्टर सुपर जायंट्सने द हंड्रेड स्पर्धा जिंकली



**लंडन : वृत्तसंस्था**

जोस बटलरच्या नेतृत्वाखालील मँचेस्टर सुपर जायंट्सने अखेर पहिल्यांदाच 'द हंड्रेड' स्पर्धेचे पुरुष गटातील विजेतेपद पटकावले आहे. अंतिम सामन्यात या संघाने ट्रेंट रॉकेट्सचा पाच गडी राखून पराभव केला. संघाला विजेतेपद मिळवून देण्यात सलामीवीर टिम सायफर्टने महत्त्वाची भूमिका बजावली. तो केवळ अंतिम सामन्याचाच नव्हे, तर संपूर्ण स्पर्धेचाही स्टार ठरला.

प्रथम फलंदाजी करताना ट्रेंट रॉकेट्सने १० षटकांमध्ये आठ गडी गमावून १५८ धावा केल्या होत्या. एन्यूरिन डोनाल्डने १९ चेंडूंत ३८ धावांची उत्तम खेळी केली. त्यानंतर मँचेस्टर सुपर जायंट्सने विजयाचे लक्ष्य गाठताना टिम सायफर्टने ३९ चेंडूंत ७२ धावांची धडाकेबाज खेळी केली, मात्र त्यानंतर संघाची लय बिघडली. संघाला शेवटच्या तीन चेंडूंवर तीन धावांची गरज होती आणि सामना अत्यंत चुरशीच्या वळणावर पोहचला होता. तीन चेंडू शिल्लक असताना पहिल्या चेंडूवर लियाम डॉसनने षटकार मारून आपल्या संघाचा विजय निश्चित केला.

मँचेस्टर सुपर जायंट्सने टी-२० स्पर्धा जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. हा आयपीएलमधील लखनऊ सुपर जायंट्स संघ आहे. मँचेस्टर सुपर जायंट्सने २०२२ आणि २०२३मध्ये उपविजेतेपद मिळवले होते आणि अगदी थोडक्यात त्यांना जेतेपदाला मुकावे लागले होते, परंतु यंदा या संघाने अखेर तो दुष्काळ संपवण्यात यश मिळवले आहे.

# वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलसाठी बांगलादेशही शर्यतीत

**सिडनी : वृत्तसंस्था**

तांझिद हसनच्या दमदार शतकानंतर गोलंदाजीत हसन महमूद आणि मेहदी हसन मिराझ यांनी मारलेल्या 'पंजा'च्या जोरावर बांगलादेशने यजमान ऑस्ट्रेलियाला पहिल्यांदाच त्यांच्या घरात पराभूत केले. डार्विनच्या मैदानातील दिमाखदार विजयासह बांगलादेशच्या संघाने मालिकेत आघाडी घेण्यासोबतच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) गुणतालिकेत विजयाची टक्केवारीही सुधारली.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विजयासह बांगलादेशची डब्ल्यूटीसी गुणतालिकेतील विजयी टक्केवारी (PCT) ५८.३३वरून थेट ६६.६७ टक्क्यांवर पोहचली असून ते चौथ्या स्थानावर कायम आहेत. दुसरीकडे ऑस्ट्रेलियाचा संघ पराभवानंतरही ७७.७७ विजयी टक्केवारीसह अजूनही अव्वलस्थानी कायम आहे. त्यापाठोपाठ ७५ टक्के विजयी टक्केवारीसह दक्षिण आफ्रिका दुसऱ्या, तर ७२.२२ टक्के विजयी टक्केवारीसह न्यूझीलंड तिसऱ्या स्थानावर आहे.

सध्याच्या घडीला भारतीय संघ डब्ल्यूटीसी मोहिमेतील निम्मा प्रवास पूर्ण करून ४८.१५ विजयी टक्केवारीसह पाचव्या स्थानावर आहे. श्रीलंकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या मालिकेनंतर टीम



इंडियाला न्यूझीलंड दौऱ्यावर दोन सामन्यांची मालिका, तर घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. या उर्वरित नऊ सामन्यांपैकी किमान सात-आठ सामन्यांत विजय मिळवला, तरच टीम इंडिया फायनलच्या शर्यतीत मजबूतपणे टिकून राहू शकते.

डब्ल्यूटीसी गुणतालिकेत बांगलादेशचा संघ टीम इंडियाच्या एक पाऊल पुढे आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटीत ऐतिहासिक विजय मिळवत बांगलादेशने यंदाच्या चक्रातील फायनलच्या शर्यतीत आपले स्थान आणखी भक्कम केले आहे. बांगलादेशला अजून ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक, दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन, वेस्ट इंडिजविरुद्ध दोन आणि इंग्लंडविरुद्ध दोन कसोटी सामने खेळायचे आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे आपली पीटीसी आणखी वाढवण्याची चांगली संधी आहे.

### भारतासमोर आव्हान

दुसरीकडे टीम इंडियाला श्रीलंकेविरुद्धच्या उर्वरित सामन्यासह न्यूझीलंडविरुद्ध दोन आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच कसोटी सामने खेळायचे आहेत. त्यामुळे भारतासमोर केवळ ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडलाच मागे टाकण्याचे आव्हान नाही, तर बांगलादेशलाही मागे टाकत डब्ल्यूटीसी फायनलच्या टॉप-२मध्ये स्थान मिळवण्याचे आव्हान आहे. बांगलादेशची ही झेप भारताच्या डब्ल्यूटीसी फायनलच्या मार्गातील स्पर्धा नक्कीच वाढवणारी ठरली आहे.

# 'हिटमॅन'चा जबरा फॅन!

## ओडिशाहून सायकलवर पोहचला मुंबईत

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा स्टार फलंदाज रोहित शर्मा हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात लोकप्रिय खेळाडूंपैकी एक आहे. रोहितने टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्यामुळे तो केवळ आयपीएल आणि वनडे क्रिकेट खेळताना दिसून येतो. पण जेव्हा तो मैदानात खेळण्यासाठी उतरतो, त्यावेळी त्याची एक झलक पाहण्यासाठी चाहते तुफान गर्दी करतात. हिटमॅनच्या जबरा फॅनचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

ओडिशा येथे राहणारा सुनील नावाचा फॅन १८०० किमी सायकलने प्रवास करून रोहित शर्माला भेटण्यासाठी आणि त्याला शुभेच्छा देण्यासाठी मुंबईत दाखल झाला आहे. सुनील हा ओडिशा येथे क्रेन ऑपरेटरचे काम करतो.




त्याचे वडील शेतकरी आहेत. त्याची एकच ईच्छा होती, ती म्हणजे आपला आवडता खेळाडू रोहित शर्माला भेटायचे आणि त्याला आगामी वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेसाठी शुभेच्छा द्यायचे. रोहितची भेट घेऊन त्याला आगामी वर्ल्डकप स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

मुंबईत पोहचल्यानंतर सुनीलने रोहित शर्माची भेट घेतली आणि त्याला भगवान जगन्नाथांची मूर्ती भेट म्हणून दिली. रोहितने या मूर्तीचा स्वीकार करून त्याच्यासोबत फोटो क्लिक केला. अशा प्रकारे हिटमॅनने फॅनचा मानही राखला.

### अडथळ्यांवर केली मात

माध्यमातील वृत्तानुसार सुनीलने मेहनत करून आठ हजार रुपये जमवले आणि सायकल खरेदी केली. १५ दिवसाआधी तो मुंबई गाठण्यासाठी ओडिशाहून सायकल घेऊन निघाला. सुनीलने सांगितले की, या प्रवासादरम्यान अनेकांनी त्याला २०० आणि ५०० रुपये देऊन मदत करण्याचा प्रयत्न केला, पण त्याने कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत. या प्रवासादरम्यान अनेक अडथळे आले, पाऊस आला, जंगलातून प्रवास करावा लागला, मात्र त्याने माघार घेतली नाही. आपल्या आवडत्या खेळाडूला भेटण्याची जिद्द मनात ठेवून तो पुढे चालत राहिला.

# कर्णधार शुबमन गिलने टिपला अप्रतिम झेल



**कोलंबो** : भारत आणि श्रीलंका यांच्यात गॉलमध्ये पहिला कसोटी सामना खेळवला जात आहे. या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार शुबमन गिलने कुलदीप यादवच्या गोलंदाजीवर अप्रतिम झेल टिपला.

भारतीय संघ ४६२ धावांवर सर्वबाद झाल्यानंतर टीम इंडियाच्या गोलंदाजांनी श्रीलंकेचा धुव्वा उडवला. मोहम्मद सिराजने पहिल्याच षटकात भारताला ब्रेकथ्रू मिळवून दिला. यानंतर मानव सुथारने त्याच्या पहिल्या स्पेलमध्ये दोन विकेट्स घेत श्रीलंकेला धक्के दिले. त्यानंतर कुलदीप यादवला गोलंदाजीला आणत दोन्ही बाजूंनी फिरकीपटूंचे आक्रमण सुरू केले. कुलदीपने सातत्याने चांगल्या लाईन लेंथवर गोलंदाजी केल्याचं फळ त्याला विकेटच्या रूपात मिळाले.

कुलदीप यादव सामन्यातील १७वे षटक टाकण्यासाठी आला. कुलदीपचा चेंडू कामिंदू मेंडिसने फुल लेंग्गीत रूपांतरित करत ड्राइव्ह मारण्याचा प्रयत्न केला. चेंडू हवेत थोडा उंच गेल्याने तो थेट शुबमन गिलच्या दिशेने गेला. गिलची सुरूवातीपासून नजर चेंडूवर खिळलेली होती. चेंडू जमिनीकडे झुकत असतानाही गिलने डाव्या हाताने अप्रतिम झेल घेतला. गिलने सुरूवातीला दोन्ही हातांनी चेंडू टिपण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू एका दिशेने जाता दिसल्याने गिलने डावीकडे झेप घेत एका हाताने चेंडू टिपला आणि मैदानावर पडताना त्याने हाताचा कोपर मैदानावर टेकत चेंडू हातातून निसटू दिला नाही.






# वाशीत सायक्लोथॉनद्वारे नशामुक्तीचा संदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथे पोलिसांच्या पुढाकाराने भव्य सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले होते. वाशी पोलीस ठाणे, ग्लोबल आयटी आणि अवसार इन्फो यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सायकल उपक्रमाला नागरिक आणि तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याला आळा घालण्यासाठी आणि युवा पिढीमध्ये नशामुक्तीबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चांदेकर



यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सायक्लोथॉनला सुरुवात करण्यात आली. वाशी पोलीस ठाण्यापासून सुरू झालेली ही फेरी फादर एग्नेल शाळा, फोर्टिस हॉस्पिटल आणि ब्लू डायमंड हॉटेलमार्गे पुन्हा वाशी पोलीस ठाण्यात येऊन समाप्त झाली.

सायक्लोथॉनदरम्यान सहभागींकडून अमली पदार्थांपासून दूर राहण्याचा आणि निरोगी, व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारण्याचा संदेश देण्यात आला. युवकांनी अमली पदार्थांच्या आहारी जाऊ नये तसेच व्यसनाचे दुष्परिणाम समाजापर्यंत पोहचावेत हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

या अभियानात समीर वानखेडे विचार मंचाच्या प्रतिनिधींनी विशेष निमंत्रणावरून सहभाग नोंदवला. पोलीस प्रशासन, आयोजक आणि सहभागी नागरिकांनी एकत्रितपणे नशामुक्त समाजासाठी जनजागृती करण्याचा निर्धार व्यक्त केला. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, क्रीडा आणि सकारात्मक उपक्रमांकडे वळावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com